cmyk

संपादकीय

## आघाडीतला अवमेळ कधी मिटणार?

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या निमित्ताने युती-आघाड्या अधूनमधून चर्चेत येतात. 'याल तर तुमच्यासह नाहीतर तुमच्याविना' अशा आशयाच्या घोषणा राणा भीमदेवी थाटात सर्वच पक्ष करतात. तथापि, भाजपसारखा एखाददुसरा बलाढ्य पक्ष सोडला तर सत्ताप्राप्तीसाठी युती-आघाडीचे राजकारण इतर पक्षांसाठी अपरिहार्य ठरत असावे.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-१८६ | सोमवार दि.३ नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


# १ जुलै पासून शेतकऱ्यांचा पुन्हा एल्गार!

## कर्जमाफी होत नाही तोपर्यंत भाजपसह मित्र पक्षाला मतदान करू नका-बच्चू कडू

**अमरावती । प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांची कर्जमाफी होत नाही तोपर्यंत भाजप आणि मित्र पक्षाला आगामी निवडणुकीत मतदान करू नका, असे आवाहन प्रहार संघटनेचे प्रमुख माजी आमदार बच्चू कडू आणि त्यांच्या टिमने केले आहे. याशिवाय शासनाने आपला शब्द पाळला नाहीतर १ जुलै पासून पुन्हा शेतकऱ्यांचा एल्गार सुरू होईल, असाही इशारा त्यांनी दिला.**



शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आंदोलन करणारे बच्चू कडू मॅनेज झाल्याचा आरोप होतो आहे. त्यावरून बच्चू कडूंनी विरोधकांवर रविवारी (दि.२) पत्रकार परिषदेत निशाणा साधला. तुम्ही आंदोलन करा त्यात आम्हीही येऊ, असे ते म्हणाले. ३० जून २०२६ पर्यंत सरकारने कर्जमाफी केली नाही तर १ जुलै रोजी हंगामा होईल, असा इशाराही त्यांनी दिला. ते म्हणाले, शेतकरी अजूनही आमच्या बाजूने उभा आहे. त्याला विश्वास आहे. आम्ही आंदोलनादरम्यान भर पावसात ट्रॅक्टर खाली होतो. तेथेच झोपलो, त्याचे कौतुक झाले नाही. सात दिवस अन्नत्याग आंदोलन केले त्याचेही कौतुक कोणी केले नाही. दीडशे सभा पान २ वर

# सुरेश धस यांच्यावर माझे उपकारच मात्र ते अपकाराने परतफेड करतात

## पोकळ धमक्यांना मी भिक घालत नाही-माजी आ.भीमराव धोंडे

**आष्टी । प्रतिनिधी**

**सुरेश धस यांच्यावर माझे उपकारच मात्र ते अपकाराने परतफेड करतात आम्ही उपकार करूनही अपकार करणं ही सुरेश धस यांची सवय आहे. आम्हाला धमक्या देऊ नयेत, आम्हीही इथलेच आहोत. अशा पोकळ धमक्यांना मी भीक घालत नाही, असे जोरदार प्रत्युत्तर माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आमदार सुरेश धस यांच्या वक्तव्याला दिले आहे.**



रविवारी आष्टी येथील आनंद भवन येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत माजी आ.भिमराव धोंडे यांनी आ.सुरेश धस यांनी केलेल्या प्रत्येक आरोपाला सडेतोड उत्तर दिले. सुरेश धस यांनी पत्रकार परिषदेत, "कारखान्याचा परवाना आमदार रद्द करू शकतो का?" असा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर धोंडे म्हणाले, "आमच्याकडे तुमच्याच पत्रातून परवाना रद्द करण्याबाबतचा मजकूर आहे. आम्ही काही दूधखुळे नाही. कडा साखर कारखाना आम्ही खासगी खरेदी करू शकलो असतो, पण तसे केले असते तर तुम्हीच पान २ वर

# ७ बालकासह २७ ऊसतोड कामगारांना ओलीस ठेवले

**पुणे प्रतिनिधी**

पुण्यातील दौंडमधून संतापजनक बातमी समोर आली आहे. गुऱ्हाळावर मजुरी करणाऱ्या एका कुटुंबासह एकूण २७ जणांना जबरदस्तीने कामाला लावल्याचा आणि त्यांना ओलीस ठेवल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. धक्कादायक म्हणजे या कामगारांमध्ये २ गरोदर महिलांचा समावेश असून ७ मुलेही होती. दौंड तालुक्यातील राहु गावातील हिरामण गाढवे यांच्या गुऱ्हाळावर मजुरी करणाऱ्या एका कुटुंबासह एकूण २७ जणांना जबरदस्तीने कामाला लावले. तसेच त्यांना डांबून ठेवण्यात आले. या प्रकरणात पीडित मजुरांनी यवत पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवली असून, पोलिसांनी



सर्व मजुरांची सुखरूप सुटका केली आहे.

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, कामाचा मोबदला प्रति टन ३०० रुपये ठरवण्यात आला होता. मात्र, हिरामण गाढवे यांच्याकडे मजुरांनी वारंवार मागणी करूनही ते कामाचा योग्य हिशेब देत नव्हते. तसेच त्यांनी काम सोडून मजुरांना गावाबाहेर जाण्यास पान २ वर

## थोडक्यात...

### आता नीट नव्हे तर एक्झीट टेस्ट परीक्षा द्यावी लागणार

पुणे : भारतातील वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात आता एक मोठा बदल घडणार आहे. नॅशनल मेडिकल कमिशनने स्पष्ट केले की, देशातील वैद्यकीय पदवीधरांसाठी नॅशनल एक्झिट टेस्ट परीक्षा लागू करण्याची तयारी सुरू आहे. ही परीक्षा सध्याच्या नीट पीजीची जागा घेणार असून डॉक्टर होण्याची, वैद्यकीय व्यवसायाचा परवाना मिळवण्याची आणि पीजी प्रवेश घेण्याची संपूर्ण प्रक्रिया बदलणार आहे. मात्र, हा बदल लगेच होणार नाही. आतापर्यंत भारतात वैद्यकीय शिक्षणासाठी नीट परीक्षा ही एमबीबीएस आणि बीडीएस कोर्समध्ये प्रवेश मिळवण्यासाठी घेतली जात होती. परंतु एनएमसीच्या नव्या नियमानुसार, परीक्षा आता केवळ प्रवेशासाठीच नाही, तर डॉक्टर बनण्यासाठी, मेडिकल लायसन्स मिळवण्यासाठी आणि पोस्ट ग्रॅज्युएट प्रवेशासाठी एकच परीक्षा असेल.

### अमेझॉन, मेटा आणि गुगलच्या नोकऱ्या गेल्या

मुंबई: तंत्रज्ञान क्षेत्र या वर्षी गंभीर संकटातून जात आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि ऑटोमेशनमुळे कंपन्यांच्या कामाला वेग आला असला तरी याच तंत्रज्ञानामुळे हजारो कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. अमेरिकेतील सिलिकॉन व्हॅलीपासून ते भारतातील बंगळुरूपर्यंत टेक सेक्टरमध्ये मोठ्या प्रमाणावर कर्मचारी कपातीचा धडाका सुरुच आहे. डेटा प्लॅटफॉर्मनुसार, २०२५ हे नोकर कपातीचं वर्ष ठरत आहे. आतापर्यंत २१८ हून अधिक कंपन्यांनी एक लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केलं आहे. या वर्षी सर्वात मोठी कपात अमेरिकन चिप निर्माता कंपनी इंटेलने केली आहे. कंपनीने आपल्या जागतिक कर्मचार्यांपैकी जवळपास २२ टक्के म्हणजेच तब्बल २४,००० कर्मचाऱ्यांना बाहेरचा रस्ता दाखवला आहे. अमेरिका, जर्मनी, पोलंड आणि कोस्टा रिका येथील कार्यालयांमध्ये ही कपात करण्यात आली आहे.

### पाकविरोधात भारताची अफगाणला मदत

काबुल :अफगाणिस्तानला पुन्हा एकदा कठीण परिस्थितीत भारताने मोठी मदत केली आहे. भारताकडून काबूलला १६ टन औषधे आणि डायग्नोस्टिक किट पाठवण्यात आल्या आहेत. ज्या अफगाणिस्तानच्या आरोग्य मंत्रालयाला सुपूर्द करण्यात आल्या आहेत. मलेरिया, डेंग्यू आणि लीशमॅनियासिससारख्या संसर्गजन्य आजारांचा सामना करण्यासाठी ही मदत देण्यात आली आहे. यासंदर्भात, अफगाणिस्तानच्या आरोग्य मंत्रालयाने, कृतज्ञता व्यक्त केली असून भारताने पाठवलेली ही मदत देशाचे आरोग्य क्षेत्र चांगले करण्यासाठी आणि रोग नियंत्रणाच्या कार्यात महत्वाची ठरेल असे म्हटले आहे.

### भाजपसाठी शिंदे-दादांची गरज संपली -रोहित पवार

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत युती नसल्याने बोगस मतदारयाद्यांचा फटका आपल्याला बसेल अशी भीती महायुतीतील राष्ट्रवादी आणि शिंदे गटाला आहे. त्यामुळेच त्यांच्या आमदारांची खदखद बाहेर येत असल्याची टीका आमदार रोहित पवार यांनी केली. भाजपच्या लेखी मित्रपक्षांची उपयुक्तता संपली असून, त्या कुबड्या आता अडकवल्या जातील की चुलीत घातल्या जातील हे पाहावं लागेल असा टोलाही रोहित पवारांनी लगावला. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी एक सोशल मीडिया पोस्ट शेअर केली आहे. त्यामध्ये त्यांनी भाजपचे मित्रपक्ष असलेल्या अजित पवारांची राष्ट्रवादी आणि शिंदेंच्या शिवसेनेवर टीका केली. बोगस मतदार यादीचा फटका आपल्याला बसेल अशी भीती या दोन्ही पक्षांना असल्याचं रोहित पवार म्हणाले.

# शेतकऱ्यांना भिक नको, त्यांचा हक्क हवा

## प्रकाश आंबेडकर यांची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका

**पुणे । प्रतिनिधी**

अजित पवार यांनी केलेल्या "सरकार शेतकऱ्यांचे कर्ज किती काळ माफ करत राहणार?" या विधानावरून वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी टीका करताना म्हणाले की, "अजित पवार, तुम्हाला महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी आत्महत्या कराव्यात असे वाटते का?



पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, महाराष्ट्रातील शेतकरी आजही अवकाळी पावसामुळे, पिकांच्या नुकसानीमुळे आणि शेतमालाला योग्य भाव न मिळाल्यामुळे मोठ्या अडचणीत आहेत. हे शेतकरी कठोर परिश्रमाने अन्न पिकवतात, पण तुमचे सरकार त्यांच्या कष्टाची परतफेडही करू शकत नाही, असेही यावेळी सांगितले. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, सोयाबीनसाठी सरकारने जाहीर पान २ वर

# पंकजा-धनंजय दोघेही स्व.मुंडेंचे वारसदार जानकरचे नाव घेताच पाशा पटेल बरळले

**बीड -परळी । प्रतिनिधी**

गोपीनाथ मुंडे यांचा खरा राजकीय वारसदार कोण? हा नवीन वाद राज्याच्या राजकारणात सुरू आहे. मंत्री छगन भुजबळ यांनी बीडमध्ये गेल्या महिन्याच्या सुरुवातीला ओबीसी महाएल्गार मोर्च्यात धनंजय मुंडे यांना वारसदार म्हणून संबोधले. यावरच स्व. मुंडे यांचे निकटवर्ती पाशा पटेल परळीत आले तेव्हा त्यांना हाच प्रश्न विचारला. त्यावर ते म्हणाले, स्व.मुंडे यांची कन्या पंकजा आहे तर धनंजय पुतण्या आहे. त्यामुळे दोघेही वारसदार आहेत. यावर महादेव जानकर



देखील मी वारसदार असल्याचे सांगत आहेत, या प्रशांवर उत्तर देताना जक हसले अन म्हणाले निजामालाही ७०० बायका होत्या. त्याला काय अर्थ आहे. असे पान २ वर

### नेदरलॅन्डला मिळणार समलैंगिक पंतप्रधान

ॲमस्टरडॅम : नेदरलँड्सच्या राजकारणासाठी ऐतिहासिक क्षण आला असून डच सेंट्रिस्ट पार्टी डी चे ३८ वर्षीय नेते रॉब जेटन देशाचे सर्वात तरुण आणि पहिले समलैंगिक पंतप्रधान बनणार आहेत. २९ ऑक्टोबरला झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांच्या पक्षाने मोठा विजय मिळवला आहे. जेटन यांनी अँटी-इस्लाम पॉप्युलिस्ट गीर्ट वाइल्डर्स यांचा निवडणुकीत पराभव केला. रॉब जेटन यांनी फक्त दोन वर्षांत आपल्या पक्षाला सर्वात खालून डच राजकारणाच्या केंद्रस्थानी आणले. त्यांनी माजी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांची प्रसिद्ध घोषणा यस वी कॅनची प्रेरणा घेत हेट कॅन वी (म्हणजेच हे शक्य आहे) हा सकारात्मक नारा दिला. जेटन यांच्या नेतृत्वाखाली पान २ वर

# वैद्यकीय प्रवेश निकालाचा घोळ पोहचला हायकोर्टात

## राज्य सरकारविरोधात याचिका दाखल

**मुंबई प्रतिनिधी**

वैद्यकीय प्रवेशाच्या गट ब अभ्यासक्रमांच्या तिसऱ्या फेरीच्या निकालांची घोषणा २०२५-२६ शैक्षणिक वर्षाच्या वैद्यकीय प्रवेशाच्या गट अ अभ्यासक्रमांच्या तिसऱ्या फेरीच्या निकालांपूर्वीच करण्यात आली आहे. यावर उच्च न्यायालयात आक्षेप घेण्यात आला आहे. याप्रकरणी राज्य सरकार, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय तसेच राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाविरुद्ध याचिका दाखल करण्यात आली आहे.

वैद्यकीय प्रवेश घेऊ इच्छिणारी पुण्यातील विद्यार्थिनी पूर्वा वाघ हिने यासंदर्भात उच्च न्यायालयात पान २ वर

# जालन्यात चक्क पोलिसाचे घर फोडले सोने, चांदी, पैसे, काहीच सोडले नाही

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील समर्थनगर शिवनेरी अपार्टमेंट घाटी रोड जुना जालना येथे राहत्या घरी चोरी झाली. अज्ञात चोरट्यांनी २५ आणि २६ ऑक्टोबरच्या रात्री १ वाजेच्या सुमारास चोरी केली. चोरट्यांनी त्यांच्या घराच्या दरवाजाचा कडीकोंडा तोडून घरात प्रवेश केला. सोने - चांदी आणि रोख रक्कम असा लाखोंचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला. फिर्यादी हा स्वतः पोलीस कॉन्स्टेबल राजेंद्र हेमंत कुमार ठाकूर आहेत. पोलिसांचे घर सुरक्षित नाही तर सर्वसामान्यांचे काय अशी चर्चा होत आहे.

पोलीस कॉन्स्टेबल राजेंद्र ठाकूर हे त्यांच्या संपूर्ण कुटुंबासह इंदूर येथे त्यांच्या नातेवाईकांकडे गेले पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१ नोव्हेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५५.०० क्विंटल | २,३११ | २,८६० | २,६११ |
| ज्वारी/हायब्रिड :६८.०० क्विंटल | २,२०० | ३,४४० | २,८२७ |
| मका/लोकल: ५०.०० क्विंटल | १,९५० | १,९५० | १,९५० |
| तूर : १०.५० क्विंटल | ६,८५१ | ६,८५१ | ६,८५१ |
| उडीद : १८.५० क्विंटल | ३,८५० | ५,२३६ | ४,७३० |
| बाजरी: २८.५० क्विंटल | २,०५२ | २,८०० | २,५३५ |
| मुग:४.५० क्विंटल | ४,९०० | ५,७०१ | ५,३०० |
| सोयाबीन: ९.०० क्विंटल | ४,३०० | ४,३५० | ४,३२५ |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ५,००१ | ५,२५० | ५,१२५ |

# मशिदी झाल्या डिजिटल; 'अजान ॲप लॉन्च'

**नाशिक । पतिनिधी**

सरकारकडून मशिदींवरील लाऊडस्पीकरवर बंदी घालण्यात आल्यानंतर नाशिकमध्ये या निर्णयावर वाद न घालता एक डिजिटल तोडगा काढण्यात आला आहे. शहरातील काही मशिदींनी 'अजान ॲप्लिकेशन' लॉन्च केले असून, इतर मशिदींमध्येही या ॲपवर नोंदणी सुरू आहे. या ॲपमध्ये नमाजाच्या वेळापत्रकानुसार अजान दिली जाते आणि नोंदणी केलेले समाजबांधव ती आपल्या मोबाईलवर ऐकू शकतात. फक्त दोन दिवसांत ५०० हून अधिक मुस्लिम बांधवांनी हे अजान ॲप डाऊनलोड केले आहे. हे ॲप तामिळनाडूतील एका कंपनीने तयार केले आहे. एकदा इन्स्टॉल केल्यावर हे ॲप स्वयंचलितपणे (ऑटोमॅटिक) कार्यरत राहते.

शहरातील अशोका मार्गावरील 'फातेमा एज्युकेशन ट्रस्ट'ने त्यांच्या फातेमा मशिदीसाठी या विशेष अजान ॲपचा पान २ वर



### ॲपमुळे मोठा फायदा

राज्य सरकारने न्यायालयाच्या आदेशानुसार मशिदीवरील भोंग्यावर बंदी घातली आहे. त्यामुळे अनेकदा लोक कामात व्यस्त असल्याने अजानची वेळ कळत नाही. या अजान ॲपमुळे आम्हाला मोठा फायदा झाला आहे. जेव्हा नमाजाची वेळ होते, त्यापूर्वी २ मिनिटे अजान वाजते. हे सर्व अजान ॲपद्वारे सर्वांच्या मोबाईलवर कळते. त्यामुळे मुस्लिम बांधवांना समजते की, ही फजर, जोहर, मागरिब, असर की ईशाची नमाजाची वेळ झाली आहे, अशी माहिती डॉ. इजहार खान यांनी दिली.

# हिवाळी अधिवेशनाआधी घरघर

## ७८ कोटींचे बिल थकित

**नागपूर । प्रतिनिधी**

**विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन यंदा ८ डिसेंबरपासून नागपूर विधान भवन येथे पार पडणार आहे. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असून, त्या पार्श्वभूमीवर या अधिवेशनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र, या हिवाळी अधिवेशनावर संकटांचे सावट आहे. कारण नागपुरात कंत्राटदारांनी काम बंद आंदोलन सुरू केले आहे. त्याचे कारण आणि कामाचा मावेजा जवळपास ७८ कोटीचे बिल थकीत असल्याने कंत्राटदारांनी तेथील काम थांबवले आहे.**

हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर जवळपास ९३.९४ कोटींच्या निविदा सार्वजनिक बांधकाम विभागाने जारी केल्या आहेत. मात्र ठेकेदारांकडून थकित बिलांच्या देयकासाठी काम बंद आंदोलन सुरू केले आहे. हिवाळी अधिवेशनाच्या काळातील



कामांचे गेल्या वर्षीचे ७८ कोटींचे बिल अद्याप प्रलंबित असल्याचे कारण देत नागपूर कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनने यंदा काम करण्यास नकार दिला आहे. दिवाळीपर्यंत थकित पैसे देऊ, असे आश्वासन सरकारने दिले होते. मात्र, दिवाळी निघून गेल्यानंतरही सरकारने मागील वर्षांचे थकित पैसे अजून दिलेले नाहीत. त्यामुळे यंदा नवे काम करण्यास आम्ही पान २ वर

### तर अधिवेशन घेणे अवघड

१० नोव्हेंबरपर्यंत काम सुरू नाही झाले तर नागपुरात हिवाळी अधिवेशन घेणे अवघड आहे. सरकारला याबाबत कळवण्यात येणार आहे. थकित बिलांच्या देयकासाठी आवश्यक त्या हालचाली केल्या जात असल्याची माहिती ठेकेदारांना सरकारकडून देण्यात आली आहे. अर्थमंत्रालयाकडे मंजुरीसाठी फाईल पाठवली असल्याचेही त्यांना सांगण्यात आले आहे. निधी मंजूर होताच थकित बिलांचे देयक प्रक्रिया सुरू केली जाणार आहे, असे बांधकाम विभागाकडून कंत्राटदारांना सांगण्यात आले आहे.

cmyk

अग्रलेख

# आघाडीतला अवमेळ कधी मिटणार?

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या निमित्ताने युती-आघाड्या अधूनमधून चर्चेत येतात. 'याल तर तुमच्यासह नाहीतर तुमच्याविना' अशा आशयाच्या घोषणा राणा भीमदेवी थाटात सर्वच पक्ष करतात. तथापि, भाजपसारखा एखाददुसरा बलाढ्य पक्ष सोडला तर सत्ताप्राप्तीसाठी युती-आघाडीचे राजकारण इतर पक्षांसाठी अपरिहार्य ठरत असावे. याची सुरुवात उद्धवसेना आणि मनसेना या दोन पक्षांनी केली असल्याचे दिसत आहे. राज्यभरातील कार्यकर्तेही याच घोषणेच्या प्रतीक्षेत होते.

निवडणुकांचे वेध सर्वच राजकीय पक्षांना लागले आहेत. स्थानिक लोकप्रतिनिधींच्या निधीतून साकारलेल्या सार्वजनिक उपक्रमांचे लोकार्पण, दिवाळीनिमित्त काही शहरांमध्ये भेटवस्तूंचे वाटप, लोकप्रतिनिधींनी घेतलेल्या सामान्यांच्या भेटीगाठी यातून त्याची चुणूक लोकांनी काही दिवसापुर्वीच अनुभवली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मुंबई महानगरपालिका निवडणूक लक्षवेधी मानली जाते. या निवडणुकीत उद्धवसेना आणि मनसेना एकत्र येतील असे बोलले जात आहे. पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी तशी घोषणा केल्याने निदान यापुढे तरी दोन्ही पक्षांचे नेते 'ताकाला जाऊन भांडे लपवणार नाहीत' अशी कार्यकर्त्यांची अपेक्षा आहे. अन्यथा, एकत्र येण्याच्या शर्यतेवर मनसेनेने म्हणजेच राज ठाकरे यांनी नेहमीच स्पष्टपणे भूमिका घेणे टाळले आहे. कधी मराठीच्या, हिंदी सक्तीच्या मुद्यावर, कधी फक्त टाळी देण्यासाठी तर कधी भाऊ म्हणून एकत्र आल्याचे ते सांगत आले आहेत. निदान यापुढे तरी त्याला पूर्णविराम लावला जाईल अशी अपेक्षा आहे. शनिवारी मुंबईत ठाकरे शिवसेना आणि राज यांची मनसे यांच्या नियोजनातून वा पुढाकारातून निघालेला लाखोंचा मोर्चा बरेच काही सांगून जातो. यामुळे राज्यातील अनेक राजकीय गृहीतके बदलण्याची शक्यता बळावली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नेत्यांपेक्षा राजकीय कार्यकर्त्यांच्या निवडणुका मानल्या जातात. भाजप वगळता अन्य पक्ष या निवडणुकीकडे त्यांचे अस्तित्व बळकट करण्याच्या संधी म्हणून पाहतात. कार्यकर्ते वर्षानुवर्षे पक्षासाठी राबतात. स्थानिक पातळीवर पक्ष नेता होण्याचे स्वप्न ते उराशी बाळगतात. कामाची पावती म्हणून उमेदवारी मिळेल अशी त्यांची आशा असते. पक्षांसाठीही ते सोयीचे असते. अन्यथा, कार्यकर्त्यांची वर्णी कोठे लावायची या दुविधेत सगळेच पक्ष असतात. स्थानिक स्वराज्य संस्थांचा एकूण पसारा मोठा आहे. हजारो जागांवर निवडणूक लढवली जाते. मतदारसंघगणिक राजकारण बदलत जाते. आघाडीत युती बाबत सगळेच तळ्यात मळ्यात दिसत आहे तर दुसरीकडे युतीची घोषणा जितक्या लवकर केली जाईल तितकी राजकीय गणिते मांडणे सोपे जाऊ शकेल. त्यामुळेच बहुधा सर्वच राजकीय पक्षांचे पक्षप्रवेश जोरात आहेत. तरीही युतीची घोषणा सातार्‍यापुरती मर्यादित ठेवून ठाकरे बंधूंना काय साधायचे असावे? उद्धवसेना आघाडीतील पक्षांपैकी एक आहे. ठाकरे बंधू एकत्र येण्यावर अन्य दोन पक्षांची प्रतिक्रिया आजमावणे हा त्यामागचा एक उद्देश असावा? राज यांना बरोबर घेतले तर आघाडीतील अन्य दोन पक्ष नेमकी काय भूमिका घेऊ शकतात? स्वागत करतात की नाही? याची लिटमस टेस्ट ते घेत असू शकतील.

मुंबई महानगरपालिकेपुरती काँग्रेसची भूमिका वरिष्ठ नेत्यांनी जाहीर केली आहे. ठाकरे बंधूंबरोबर काँग्रेस जाणार नाही असे संकेत मिळाले असल्याची परिस्थिती आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सातारा युतीकडे कसे बघतो हे अद्याप स्पष्ट व्हायचे आहे. काहीही असो, उद्धवसेना असो वा मनसेना दोन्ही पक्ष स्वतंत्र राजकीय अवकाशाच्या आणि घवघवीत यशाच्या प्रतीक्षेत आहेत. ठाकरे आडनावाचे गारुड कार्यकत्यावर अजूनही आहे हे दोघेही जाणून आहेत. त्याचा फायदा घ्यायच्या प्रयत्नात दोन्ही ठाकरे बंधू नसते तरच नवल. दोघांच्या भांडणाचा फायदा तिसऱ्याला होऊ नये असाही एक उद्देश असावा.

# एकनाथ शिंदेंकडून विठ्ठल-रखुमाईची महापूजा नांदेडच्या दाम्पत्याला शासकीय महापूजेचा मान

पंढरपूर । प्रतिनिधी

**कार्तिक एकादशीच्या निमित्ताने आज पंढरपुरात विठ्ठल-रखुमाईची शासकीय महापूजा संपन्न झाली. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या पत्नी लता शिंदे यांनी विठ्ठलाची महापूजा केली. यावेळी मानाचे वारकरी म्हणून नांदेड जिल्ह्यातील रामराव आणि सुशीलाबाई वालेगावकर या दाम्पत्याला महापूजा करण्याचा मान मिळाला. राज्यावरील आलेले नैसर्गिक अरिष्ट दूर होऊ दे, असे साकडे एकनाथ शिंदे यांनी विठुमाऊलीकडे घातले.**



कार्तिकी एकादशीची विठ्ठल-रखुमाईची आज पहाटे अडीच वाजता शासकीय महापूजा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शुभ हस्ते संपन्न झाली. यावेळी मानाचे वारकरी म्हणून नांदेड जिल्ह्यातील हिमायतनगर तालुक्यातील पोटी गावातील वारकरी रामराव वालेगावकर यांच्यासह मोहोळ तालुक्यातील पापरी व देवडे येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना महापूजेवेळी उपस्थित राहण्याचा मान मिळाला. कार्तिकी एकादशीनिमित्त आज मंदिरात आकर्षक फुलांची सजावट देखील करण्यात आली. कार्तिकीसाठी राज्याच्या कानाकोप-यातून सुमारे सहा लाख भाविक विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरमध्ये दाखल झालेले आहेत. राज्यावर आलेले नैसर्गिक संकट लवकर दूर होऊ दे, माझा बळिराजा सुखी-समाधानी राहू दे, असे साकडे आपण विठुरायाच्या चरणी घातल्याचे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. आज पहाटे अडीच वाजता कार्तिकी एकादशीची विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाली.पंढरपूरमध्ये आल्यानंतर वेगळे समाधान मिळते. महापूजा करण्याचे भाग्य मिळाले. बळिराजा संकटात आहे. त्याच्यावरील अरिष्ट दूर कर, मंत्रिमंडळाने ३२ हजार कोटींचे मदत दिली. कर्जमाफी उपायाबाबत सरकारने निर्णय घेतला. त्याची शिफारस एप्रिलमध्ये येईल. पांडुरंगाकडे साकडे घातले शेतकरी, वारकरी, लाडक्या बहिणी सगळ्यांच्या जीवनात सुख-समाधान, आनंदाचे दिवस येऊ दे. सगळे अरिष्ट दूर होऊ दे. महाराष्ट्र सगळ्या क्षेत्रात नंबर एक होऊ दे असे यावेळी एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

# तरुण पिढी नैराश्याच्या गर्तेत-डॉ.जगदीश टेकाळे

बीड । प्रतिनिधी

धकाधकीच्या जीवनात मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत आहेत, विशेषतः तरुण पिढीमध्ये. नैराश्य ही आता एक गंभीर मानसिक आजार बनला आहे. पालकांनी आणि समाजाने वेळीच यावर लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. आजकाल अनेक तरुण आणि लहान वयाची मुले नैराश्याला बळी पडत आहेत. त्यांच्यावर असलेला शैक्षणिक ताण, सोशल मीडियाचा प्रभाव आणि नात्यांमधील गुंतागुंत ही याची काही प्रमुख कारणे आहेत.



हेल्थ-शैक्षणिक आणि करिअरचा ताण :-आजच्या स्पर्धात्मक जगात मुलांवर चांगले गुण मिळवण्याचा, उत्तम कॉलेजमध्ये प्रवेश मिळवण्याचा आणि यशस्वी करिअर निवडण्याचा प्रचंड दबाव असतो. सोशल मीडियाचा प्रभाव : सोशल मीडियावर दिसणारे परफेक्ट आयुष्य, इतरांशी सततची तुलना आणि सायबर बुलिंग यामुळे तरुणांना आपण कमी पडत आहोत असे वाटू लागते. नात्यांमधील गुंतागुंत : प्रेमातील अपयश, मित्र मैत्रिणींशी होणारे वाद किंवा एकटेपणाची भावना हेदेखील डिप्रेशनचे एक कारण आहे. या काळात मुले संवेदनशील असतात. हार्मोनल बदल : तारुण्याच्याकाळात शरीरात अनेक शारीरिक आणि हार्मोनल बदल होत असतात. हे बदल भावनिक अस्थिरता निर्माण करतात आणि नैराश्याचे कारण बनू शकतात. मित्र-मैत्रिणींपासून दूर राहणे, आवडणाऱ्या गोष्टींमध्ये रस न वाटणे, जेवणाच्या आणि झोपण्याच्या सवयींमध्ये बदल. सतत उदास आणि निराश वाटणे, सतत चिडचिड करणे. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले.

# राष्ट्र उभारणीचा मुख्य पाया शिक्षक; शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही प्राधान्य देऊ- सुषमा अंधारे मॅडम

बीड । प्रतिनिधी

**राष्ट्र उभारणीचा मुख्य पाया शिक्षक आहेत. ही बाब सर्वांनी लक्षात घेतली पाहिजे. शिक्षकांना येणाऱ्या अडचणी तात्काळ दूर केल्या पाहिजे. परंतु दुर्दैवाची गोष्ट या राज्यामध्ये शिक्षकांना वेठीस धरण्याचे काम राज्य सरकारकडून केले जाते. शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही सदैव प्राधान्य देत आहोत. यापुढे शिक्षकांचे प्रश्न प्राधान्याने सोडवू असे आश्वासन शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी शिवसेना शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री लक्ष्मण बहिरवाळ आणि विनाअनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ यांच्याशी बोलताना दिले. या वेळी त्यांच्या समवेत शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम आणि नितीन भैय्या धांडे आदी उपस्थित होते.**



शिवसेना प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या अतिशय निकटवर्तीय आणि शिवसेनेच्या उपनेत्या मा. सुषमाताई अंधारे मॅडम ह्या आज गुरुवार दिनांक ३० ऑक्टोबर २०२५ रोजी बीड शहरात आल्या होत्या. यावेळी बीड शहरातील शिक्षकांनी त्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी शिक्षकांच्या विविध प्रश्नावर चर्चा केली. यावेळी बोलताना सुषमाताई अंधारे मॅडम म्हणाल्या की, शिक्षक हे समाजाचे योग्य दिशा दर्शक आहेत. ते मुलांचा सर्वांगीण विकास घडवून सुसंस्कारित पिढी निर्माण करतात. हीच पिढी देशाच्या विकासात महत्त्वाचा वाटा उचलते; म्हणूनच राष्ट्र उभारणीचा मुख्य पायाच शिक्षकाना मानले जात आहे. ही बाब शासनाने आणि समाजाने लक्षात घेतली पाहिजे. शिक्षकांना येणाऱ्या अडचणी तात्काळ दूर केल्या पाहिजे. परंतु दुर्दैवाची गोष्ट या राज्यामध्ये शिक्षकांना वेठीस धरण्याचे काम सरकारकडून केले जाते. शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही प्राधान्य देतो यापुढे ही प्राधान्य देऊ असे शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी शिक्षक सेना जिल्हाध्यक्ष श्री. लक्ष्मण बहिरवाळ आणि विनाअनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ सर यांच्याशी चर्चा करताना सांगितले. या वेळी श्री लक्ष्मण वाघमारे सर, श्री शिंदे सर, श्री. शिवप्रसाद सिरसाट सर यांच्यासह इतर शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# सेवानिवृत्तीनंतर समाधानाने जीवन जगावे-पोलीस अधीक्षक कॉवत

## सहाय्यक फौजदार बाळासाहेब शिरसाट, वजुरकर यांचा सेवानिवृत्ती गौरव सोहळा





बीड । प्रतिनिधी

**जिल्हा पोलिस दलात ३३ वर्षे सेवा केलेले सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक बाळासाहेब रघुनाथ शिरसाट यांच्यासह चार पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवापुर्तीमुळे गौरविण्यात आले. नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त झालेल्या पोलिसांचा जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांचे हस्ते शुक्रवारी सपत्नीक सन्मानित करून सेवागौरव करण्यात आला.**

यावेळी बोलतांना जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत म्हणाले, पोलिसांचे जीवन अत्यावश्यक सेवा आहे. कुटुंबीयांच्या पाठिब्यामुळे पोलीस चांगले काम करतात. त्यामुळे चांगले यश मिळते. सेवानिवृत्तीनंतर समाधानाने जीवन जगावे, समा यासाठी आपण सेवा केली आहे यापुढे काही आणि अडचणी असल्यास जिल्हा पोलीस अथवा प्रत्यक्ष माझ्याशी संपर्क करावा. जीवनाचा दुसरा टप्पा आता सुरू झाला आहे. पोलीस खात्याशी संबंध कायमचे राहतील. नियुक्ती आणि सेवानिवृत्ती हे दोन्ही महत्वाचे आहे. आनंदी जीवन जगावे अशीही यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक कॉवत त्यांनी म्हटले. यावेळी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बाळासाहेब शिरसाट, अशोक नामदेवराव थोरात, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक श्रीमती वर्षा सुरेश साळुंखे, पोलिस उपनिरीक्षक संतोष पंडितराव वजुरकर यांचा सत्कार करण्यात आला. शिरसाट यांची सेवा ३३ वर्षे झाली. त्यांना १४३ अवॉर्ड तर ५ प्रमाणपत्र मिळाले. यावेळी ईश्वरी गायकवाड, प्रकाश वक्ते, सौ. विजया सानप, ॲड. रविकिरण वजुरकर, यांनी सेवानिवृत्त पोलिस अधिकारी कर्मचारी यांच्या कार्याविषयी कौतुक केले. कार्यक्रमास सेवानिवृत्त फौजदार शिवाजी भारती, सरपंच नवनाथ सानप, अशोक सानप, बबनराव सानप, आदींची उपस्थिती होती.

## पान १ वरून...

### १ जुलै पासून शेतकऱ्यांचा

संपूर्ण महाराष्ट्रात घेतल्या त्याचेही कौतुक झाले नाही. फक्त आमचे काय चुकले हेच बघितले जाते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या आम्ही थांबवायला चाललो आहे. मात्र उद्या आमच्यावरच आत्महत्येची वेळ येईल, अवस्था आहे, असेही बच्चू कडू म्हणाले. ३० जून पर्यंत कर्जमाफी झाली नाही तर १ जुलै रोजी चहू बाजूने हंगामा होईल. आणि जोपर्यंत कर्जमाफी होत नाही तोपर्यंत शेतकऱ्यांनी भाजप, अजित पवारांची राष्ट्रवादी, एकनाथ शिंदे यांची शिवसेना या पक्षांना जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत मतदान करू नका, असे आवाहनही कडू यांनी केले.

-------------

### ७ बालकासह २७ ऊसतोड

सक्त मनाई केली होती. कोणत्याही कारणाने, अगदी नातेवाईक आजारी पडले किंवा मृत पावले तरी गावाला जाण्यास गाढवे यांनी बंदी घातली होती. याविरोधात मजुरांनी जाब विचारल्यास गाढवे मजुरांना डांबून ठेवण्याच्या धमक्या देत होते. मागील महिन्यात हिरामण गाढवे आणि अरुण गाढवे यांनी फिर्यादींच्या भाच्याला, शिवराम रघुनाथ रजपूत याला आजारी असूनही काम करत नाहीस या कारणावरून उसाने तसेच लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. मारहाणीनंतर शिवराम याला घरात बंद करून ठेवले. त्यानंतर मजुरांना पोलिसांकडे तक्रार केल्यास खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची दमदाटी करण्यात आली. या संतापजनक घटनेची माहिती मिळताच २८ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ च्या सुमारास यवत पोलिस ठाण्याचे सतीश रजपूत, पोलिस हवालदार हनुमंत भगत, संदीप करे, सुनील आव्हाड, जयंत भोसले, शुभम गुरव आणि मंगेश थोरात यांनी घटनास्थळी धाव घेत सर्व मजुरांची सुटका केली. ही संपूर्ण कारवाई जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मजुरांमध्ये जाधव, माळी, रजपूत आणि बरडे या कुटुंबांतील पुरुष, महिला आणि लहान मुले असा २७ जणांचा समावेश होता. या २७ जणांमध्ये दोन गरोदर महिलांचा समावेश होता.

------------

### सुरेश धस यांच्यावर माझे उपकारच

पुन्हा टीका केली असती. ते पुढे म्हणाले, जर तुम्हाला खरेच कडा साखर कारखाना चालवायचा असेल, तर आम्ही तो देण्यासाठी तयार आहोत. पण धमक्या देऊन काही होणार नाही. कारभारातील अनियमिततेबाबत चौकशी करायची असेल तर जरूर करा. धोंडे यांनी सांगितले की, ८ एप्रिल २०२४ रोजी कारखान्याचा परवाना रद्द झाला तेव्हा संचालक मंडळ अस्तित्वात नव्हते. नवीन सरकार आल्यावर बाबासाहेब पाटील यांनी नवीन संचालक मंडळाला मान्यता दिली. कामगारांच्या वेतनासंदर्भात ते म्हणाले, बॅलन्सशीटनुसार कामगारांचा पगार २ कोटी ६४ लाख रुपये आहे, पण काही विघ्नसंतोषी कामगारांनी चुकीची माहिती देऊन असंतोष निर्माण केला. धोंडे यांनी सुरेश धस यांच्यावर टोला लगावत म्हटले की, तुम्ही दोन वर्षे सुपर टेक फोर्जिंग कंपनीच्या माध्यमातून कारखाना चालविला, त्यावेळी कामगारांचे पीएफ थकवले. आम्ही कारखाना घेतल्यानंतर तत्कालीन संचालक मंडळाने ३ कोटी २८ लाख रुपये अदा केले. शेवटी त्यांनी इशारा दिला की, आडवा-आडवी न करता मतदारसंघाच्या विकासकामात सर्वांना सामावून घ्या. शेतकरी आणि जनतेच्या हितासाठी काम करा हा माझा सल्ला आहे. कॅन्सर हॉस्पिटलसाठी कर्मचाऱ्यांनी मदत केली तर त्यात वेगळे काय. कॅन्सरचे पेशंट मोठ्या प्रमाणावर आपल्या भागात आढळून येत असल्याने हॉस्पिटल उभारण्याचा निर्णय घेतला आहे. तुम्ही आमदार आहात व गर्भ श्रीमंतही आहात हे सगळ्याा ज्ञात आहे. तुमची वैयक्तिक २५ लाखाची मदत द्या मी उद्या तुमच्या घरी येतो असा पलटवार माजी आमदार भीमराव धोंडे सुरेश धस यांच्या विधानाला केला. तसे आमदार निधीतून देखील भरीव मदत देऊ शकता. तुम्ही सरकारमध्ये आहात मुख्यमंत्री व आरोग्यमंत्र्यातून कॅन्सर हॉस्पिटल साठी भरीव निधीची तरतूद करा, असे आवाहनही धोंडे यांनी यावेळी केले.

-------------

### शेतकऱ्यांना भिक नको,

केलेली किमान आधारभूत किंमत (एमएसपी) प्रति क्विंटल ५,३२८ रुपये असूनही शेतकऱ्यांना फक्त ३,५०० ते ४,००० रुपये भाव मिळत आहे. याचा अर्थ शेतकऱ्यांना जवळजवळ ३० टक्के तोटा सहन करावा लागत आहे. कापसाची स्थितीही तितकीच गंभीर असल्याचा आरोपही यावेळी केला. प्रकाश आंबेडकर पुढे म्हणाले की, अवकाळी पावसाने राज्यातील २९ जिल्ह्यांतील ६८ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. सरकारने मदत जाहीर केली असली तरी एक पैसाही शेतकऱ्यांच्या हातात पोहोचलेला नाही. शेतकऱ्यांनी दिवाळी अंधारात घालवली, आणि त्यांच्या आशाही पावसात वाहून गेल्या अशी टीकाही यावेळी केली. सरकारच्या निष्क्रीय भूमिकेवर टीका करत प्रकाश आंबेडकर म्हणाले, तुमच्या सरकारला शांत झोप मिळावी म्हणून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी आत्महत्या कराव्यात का? शेतकऱ्यांना भिक नको, त्यांना त्यांचे हक्क हवेत असेही यावेळी सांगितले. वंचित बहुजन आघाडीने अजित पवार यांच्या शेतकरीविरोधी विधानाचा तीव्र निषेध नोंदवला असून, राज्य सरकारने तातडीने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणीही प्रकाश आंबेडकर यांनी केली.

-------------

### पंकजा-धनंजय दोघेही स्व.मुंडेंचे वारसदार

करून पाशा पटेल यांनी वाद ओढावून घेतला आहे.राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी पंकजा मुंडे या गोपीनाथ मुंडे यांच्या राजकीय वारस आहेत हे मी सांगण्याची गरज नसल्याचे म्हटले. भगवान गडावर जेव्हा भाषण झाले तेव्हा वारस पंकजा मुंडे असल्याचे गोपीनाथ मुंडे यांनी सांगितल्याचा दावा जानकरांनी केला. तर जेव्हा ते आपल्या सभेला आले, तेव्हा मला त्यांनी मानसपुत्र मानले. त्यामुळे एक नंबरला पंकजा मुंडे आहेत. दुसऱ्या क्रमांकावर प्रीतम मुंडे या आहेत. तीन नंबरला यशश्री आहे. तर चार नंबरला महादेव जानकर आहेत, असे वक्तव्य त्यांनी केले होते. भाजप नेते पाशा पटेल हे गोपीनाथ मुंडे यांचे निकटवर्तीय मानले जातात. परळीत एका कार्यक्रमासाठी ते आले होते. त्यावेळी त्यांना गोपीनाथ मुंडेंचे खरे राजकीय वारस कोण असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे हे खरेच वारसदार आहेत. एक मुलगी आहे. तर एक पुतण्या आहे, असे पटेल म्हणाले. तर महादेव जानकर यांनी स्वत:ला चौथे वारसदार म्हणून जाहीर केल्यावरही त्यांनी प्रतिक्रिया दिली. पण ही प्रतिक्रिया देताना पाशा पटेल भलतेच काही बरळले. जानकर वारस असल्याच्या दाव्यावर, "असे तर निजामालाही ७०० बायका होत्या. त्याला काय अर्थ आहे." असे वक्तव्य करून पाशा पटेल यांनी वाद ओढावून घेतला असल्याचे दिसत आहे.

-----------

### जालन्यात चक्क पोलिसाचे घर फोडले

होते. याचाच फायदा घेत चोरट्यांनी त्यांच्या घरात प्रवेश केला. चोरट्यांनी घरात असलेल्या कपाटाचे कडीकोंडा तोडून त्यात ठेवलेले १५ ग्राम वजनाची गळ्यातील सोन्याची पोत आणि ५ ग्राम वजनाची सोन्याची बदामी अंगठी, ६००० रुपये किमतीची सोन्याची अंगठी, सोन्याचे सिक्के आणि रोख २७ हजार रुपये असा लाखो रुपयांचा मुद्देमाल घेऊन चोरटे पसार झाले. ही बाब शेजारी राहणाऱ्या नागरिकांच्या लक्षात येताच त्यांनी तात्काळ पोलीस कर्मचारी राजेंद्र ठाकूर यांना फोंन केला. यावेळी त्यांनी तात्काळ जालना शहर गाठले आणि पाहणी केली असता ते चकित झाले. कारण चक्क पोलिसाच्या घरात चोरी झाली. त्यामुळे हा विषय चर्चेला कारण ठरला आहे. या निमित्ताने पुन्हा एकदा जालना शहरातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अवघ्या काही दिवसांपूर्वीच सर्वपक्षीय नेत्यांनी पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन जालना शहरातील कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवावी, भुरट्या चोरट्यांपासून शहरवासीयांची सुरक्षा करावी, अशी मागणी केली होती. पण आता पोलिसांनाच चॅलेंज करत या भुरट्या चोरट्यांनी चक्क पोलिसाच्या घरात चोरी केली. त्यामुळे पोलीस या चोरट्यांचा शोध घेणार का? असाच प्रश्न सध्या उपस्थित झाला आहे.

----------

### वैद्यकीय प्रवेश निकालाचा

दाद मागितली आहे. वैद्यकीय प्रवेश अभ्यासक्रमांच्या निकालाच्या घोषणेत मोठा घोळ घालण्यात आला असून त्याचा फटक बसून मला वैद्यकीय प्रवेशाची संधी गमावावी लागली आहे, असा दावा याचिकाकर्त्या विद्यार्थिनीने केला आहे. पूर्वा वाघ हिने वकील राहुल कामेरकर यांच्यामार्फत न्यायालयात याचिका दाखल केली आहे. तिला गट अ अभ्यासक्रमांच्या निकालात प्रवेश मिळाला आहे. तथापि, गट अ अभ्यासक्रमांच्या तिसऱ्या फेरीचा निकाल गट अ निकालापूर्वी जाहीर करण्यात आल्याने पुढील फेरीत सहभागी होण्यास मनाई केली गेली आहे, याकडे न्यायालयाचे लक्ष वेधण्यात आले. दरम्यान, याप्रकरणी न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या सुट्टीकालीन खंडपीठापुढे सुनावणी झाली. न्यायालयाने याचिकेची गंभीर दखल घेतली आणि सर्व प्रतिवादींना नोटीस बजावली. तिसऱ्या फेरीतील प्रवेश आधीच पूर्ण झाल्याची माहिती सीईटी सेलच्या वकिलांनी न्यायालयाला दिली. त्याची नोंद घेत न्यायालयाने पुढील सुनावणी सोमवारी निश्चित केली आहे.

-------------

### हिवाळी अधिवेशनाआधी

नकार दिल्याचे नागपूर कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनचे म्हणणे आहे.मिळालेल्या माहितीनुसार, हिवाळी अधिवेशनापूर्वी कंत्राटदारांनी थकित बिल न मिळाल्याने काम बंद आंदोलन सुरू केले आहे. बिलांचे निकालीकरण झाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका नागपूर कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष सुबोध सरोदे यांनी घेतली आहे. तसेच, थकित बिलांचे देयक मिळाले की, आम्ही दिवस-रात्र एक करून काम पूर्ण करू असेही सरोदे यांनी म्हटले आहे. डागडुजीचे काम अपूर्ण असल्याने उपमुख्यमंत्री यांच्या 'देवगिरी' बंगल्यासह, रवी भवन येथील अनेक कॉटेज आणि हैदराबाद हाऊसच्या बॅरेक्स रिकाम्या पडल्या आहेत. अजूनही डागडुजी आणि सौंदर्यीकरणाच्या कामाला सुरुवात झाली नाही आहे. त्यामुळे एका महिन्यात सर्व कामे पूर्ण करण्याचे आव्हान असणार आहे. अशात कंत्राटदार अनेक दिवसांपासून थकित बिला संदर्भात वेगवेगळ्या प्रकारे सरकारकडे आपल्या मागण्या करत आहेत.दरम्यान, कंत्राटदारांच्या काम बंद आदोलनामुळे राज्याचे हिवाळी अधिवेशन कुठे घ्यायचे? याचा पेच सध्या निर्माण झाला आहे. मात्र, या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून स्पष्टीकरण देण्यात आले आहे. त्यानुसार, काम लवकर सुरू झाले नाही तर ते वेळेत पूर्ण होणे कठीण आहे. एक महिन्यात हे काम पूर्ण करणे अशक्य आहे.

-------------

### मशिदी झाल्या डिजिटल;

वापर सुरू केला आहे. या ॲपद्वारे शहरातील विविध भागांमधील मशिदी एकमेकांशी जोडल्या गेल्या आहेत, ज्यामुळे नमाज पठण करणाऱ्यांना अजानची अचूक वेळ कळते. लाऊडस्पीकर बंदीनंतर संघर्षाचा मार्ग न निवडता हा नवा उपक्रम शहरातील मशीद ट्रस्टकडून राबवण्यात आला आहे. आता लाऊडस्पीकरवर अजान नसतानाही नागरिक आपल्या मोबाईलवर अजान ऐकू शकतात. गेल्या दोन दिवसांत सुमारे ५०० हून अधिक मुस्लिम समाजबांधवांनी हे ॲप डाऊनलोड करून नोंदणी केली आहे. तसेच शहरातील आणखी पाच मशिदींनी या ॲपच्या सर्व्हरवर नोंदणी केली आहे.

-------

### नेदरलॅन्डला मिळणार

डी ६६ ने विभाजनाऐवजी एकतेचा, नकारात्मकतेऐवजी सकारात्मकतेचा संदेश देणारा प्रचार केला.

-------

## गीता जयंती साजरी करावी, अखिल भारतीय वारकरी मंडळाची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

कार्तिकी एकादशीला पंढरपूर येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कडे महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक शाळेवरती गीतेची जयंती साजरी होण्याबाबत १५ ऑगस्ट १९ वा भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त गोकुळाष्टमी तसेच विश्व माऊली संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांची ७५० वी जयंती सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त भारत सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल ते म्हणजे १४ ऑगस्ट रोजी प्रत्येक शाळा आणि कॉलेजमध्ये पसायदान घ्यावे त्याचे योग्य अंमलबजावणीचे आदेश काढला आहे त्याबद्दल मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाचे मनःपूर्वक अभिनंदन अभिनंदन करण्यात आले असून प्रत्येक शाळेमध्ये गीता जयंती साजरी करावी अशी मागणी गीता जयंती उत्सव समितीचे पांडुरंग महाराज पोळ अखिल भारतीय वारकरी मंडळाचे प्रकाश महाराज बोधले, रामकृष्ण रंधवे महाराज, राधाताई महाराज, संतोष गर्जे महाराज आदींनी केली आहे .

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. ३ नोव्हेंबर २०२५



# एम-सॅण्ड धोरणामुळे बीड जिल्ह्यात बांधकाम क्षेत्राला नवा श्वास

बीड । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाने अंमलात आणलेल्या एम – सॅण्ड ( कृत्रिम वाळू ) धोरणामुळे बीड जिल्ह्यातील बांधकाम , विकासकामे आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हा प्रशासनाने या धोरणाची अंमलबजावणी जलद गतीने सुरू केली असून , जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून एकूण ५१ प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आले आहेत . या पैकी ७३ प्रस्तावांना शासनाची मान्यता मिळाली असून , उर्वरित काही प्रस्तावांचा तांत्रिक अभ्यास सुरू आहे . हे सर्व प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या ''गौण खनिज उत्खनन व विकास नियम २०१३'' अंतर्गत कार्यवाहीस पात्र ठरले आहेत.

एम – सॅण्ड म्हणजे कृत्रिम वाळू नैसर्गिक वाळूच्या पर्याय म्हणून तयार केलेली खनिज सामग्री . दगडांच्या प्रक्रियेमधून , विशिष्ट यंत्रणेद्वारे तयार केलेली ही वाळू बांधकामासाठी अत्यंत उपयुक्त , दर्जेदार आणि पर्यावरणपूरक मानली जाते . पूर्वी नैसर्गिक वाळूवर अवलंबून असलेले बांधकाम क्षेत्र आता एम – सॅण्डमुळे स्वावलंबी होत आहे . महाराष्ट्र शासनाने या क्षेत्रात पारदर्शकता आणि जबाबदार उत्खनन यासाठी हे धोरण लागू केले आहे .

एम – सॅण्डचे अनेक फायदे आहेत . नद्यांमधून होणारे अनियंत्रित उत्खनन थांबते आणि पर्यावरणाचे संतुलन राखले जाते . बांधकामासाठी हा दर्जेदार पर्याय आहे , कारण एम – सॅण्डची गुणवत्ता स्थिर असते आणि त्यात माती , सेंद्रिय घटक नसतात . त्यामुळे काँक्रीट अधिक मजबूत बनतो . स्थानिक स्तरावर उत्पादन होऊ शकते म्हणून वाहतूक खर्च कमी होतो आणि दर नियंत्रणात राहतात . ग्रामीण भागात थेट व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होते आणि शासनाला नियमित महसूल मिळतो .

जिल्हा गौण खनिज अधिकारी व तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी यांनी सांगितले की , '' एम – सॅण्ड प्रकल्पांमुळे बांधकाम उद्योगाला वाळूचा पर्याय उपलब्ध होत आहे . अवैध उत्खननावर नियंत्रण आणणे आणि वैध व्यवसायाला प्रोत्साहन देणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे . ''

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिलेल्या माहितीनुसार , जिल्ह्यातील सर्व





## महाखनिज पोर्टलवर अर्ज करा – प्रशासनाचे आवाहन

तालुक्यांमधून प्रस्ताव सादर झाले असून , त्यापैकी बहुतांश मंजूर झाले आहेत . शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार परवानग्या , पर्यावरणीय मान्यता आणि सुरक्षा उपाययोजना पूर्ण करून हे प्रकल्प लवकरच सुरू होणार आहेत . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनीही संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत की , प्रत्येक प्रकल्पाच्या कामकाजात पारदर्शकता , पर्यावरणीय तपासणी आणि स्थानिक ग्रामसभेची संमती यावर भर द्यावा .

### घरकुलात बीड जिल्हा एक नंबरवर

बीड जिल्ह्यामध्ये जवळपास १९ हजार घरे मंजूर झालेली असून यासाठी चार हजार कोटी रुपये शासनाकडून मिळणार आहेत. सध्या राज्यामध्ये बीड जिल्हा नंबर एकच्या स्थानावर आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी एम – सॅण्ड धोरण हे विकास व पर्यावरण यांचा समतोल राखणारे धोरण आहे असे आवाहन केले आहे . विभागातील सर्व जिल्ह्यांनी या संधीचा उपयोग करून स्थानिक संसाधनांवर आधारित अर्थव्यवस्था उभी करावी , असे म्हटले आहे .महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील सर्व जिल्हा प्रशासनांना निर्देश दिले आहेत की , एम – सॅण्ड प्रकल्पांना प्राधान्य देऊन पारदर्शक खनिज व्यवस्थापन सुनिश्चित करावे . अवैध वाळू उत्खननावर नियंत्रण आणण्यासाठी ही धोरणात्मक दिशा महत्त्वाची ठरेल .

बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी सांगितले की , '' एम – सॅण्ड प्रकल्पांमुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील . गावपातळीवरील तरुणांना तांत्रिक प्रशिक्षण देऊन त्यांना उद्योगाशी जोडले जाणार आहे . '' तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी म्हटलं की , '' शासनाच्या एम – सॅण्ड धोरणामुळे बांधकाम क्षेत्राला किफायतशीर आणि उपलब्ध वाळू मिळेल . तसेच पर्यावरणीय संरक्षण आणि महसूल वाढ या दोन्ही बाबी साध्य होतील . ''

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले की , '' एम – सॅण्ड प्रकल्पांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता ठेवून नागरिकांचा विश्वास संपादन करणे हेच आमचे ध्येय आहे . शासनाने केलेल्या या उपक्रमामुळे बीड जिल्हा खनिज व्यवस्थापनात आदर्श ठरेल

एम – सॅण्ड धोरण हे केवळ बांधकाम क्षेत्रासाठी नव्हे , तर पर्यावरण , रोजगार आणि महसूल व्यवस्थापनासाठीही एक दूरदृष्टीचा निर्णय आहे . बीड जिल्हा प्रशासनाने या धोरणाची यशस्वी अंमलबजावणी करून '' हरित विकास आणि पारदर्शक प्रशासन '' या दिशेने आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे.

## आ.धस यांचा मतदार संघातील शेतकऱ्यांना पूर परिस्थितीत आधार



पाटोदा । प्रतिनिधी

गेली तीन महिन्यापासून मतदारसंघासह सर्वत्र पावसाने हा :कार माजवलेला असून शेतकऱ्यांचे जनजीवन विस्कळीत झाले असून गोरे ढोरे आणि शेती वस्तू अक्षरशः पुरात वाहून गेल्याने शेतकरी देशोधरीला लागलेला असताना त्यांना आधार देण्याची महान कार्य राष्ट्रीय मतदार संघाची माजी मंत्री आमदार सुरेश आण्णा धस यांनी जीवाची परवाना करता मतदार संघात सर्वांना आधार देताना सैनिकांच्या मदतीने अनेकांचे प्राण वाचवले आज मतदारसंघात जनसमान्याचे तारणहार हे आ.धस हेच ठरल्याची प्रतिक्रिया जनासमण्यातून उमटत आहे.

गेली चार महिन्यापासून पावसामुळे शेतीचे अवशेष करायचे नुकसान झालेले असून या नुकसानीसाठी प्रशासकीय पातळीवर योग्य मार्गदर्शन करत आमदार धस यांनी प्रशासनाला शेतकऱ्यांच्या व्यथा मांडून त्यांना आधार देण्याची सुचित करत प्रत्यक्ष मतदारसंघातील घटनास्थळी भेट देऊन बाधित क्षेत्र आणि शेतकऱ्यांना आधार देण्याचे कार्य केलेले असून त्यांनी आपले पालकत्व सिद्ध करत मतदार संघातील जनसमानी नागरिकासह व्यापारी कष्टकरी शेतकरी यांना संकट काळी आधार दिल्याने आज आष्टी मतदारसंघातील शेतकऱ्यासह जलसामान्य आषाढ भूत नजरेने प्रशासनाच्या सहकार्याची अपेक्षा ठेवत अतिवृष्टी झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाईचे पैसे प्राप्त करत असल्याने मतदार संघाचे नुकसान हे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस यांच्या समोर मांडले आहे बीड जिल्हा हा आमदार दस यांच्यामुळे ८०% मध्ये प्रशासनाने दाखवला असल्याने आमदार धस यांच्या अटक परिश्रमामुळे बीड जिल्ह्याला व मतदार संघातील सर्व शेतकऱ्यांना आधार मिळण्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

## वैजाळा फाटा ते पाचेगाव रस्ता निकृष्ट दर्जाचा

पाटोदा । प्रतिनिधी

वैजाळा फाटा ते पाचंग्री हा रस्ता हा पूर्वी पंतप्रधान ग्राम सडक योजनेअंतर्गत झाला होता परंतु दहा ते बारा वर्षापासून झालेला रस्ता पुर्ण पुणे खड्डेमय रस्ता झाला होता. परंतु वैजाळा ग्रामस्थांनी वेळोवेळी निवेदन देऊन प्रशासनाला विनंती करुन रस्त्याचे दोन किलोमीटरचे टेंडर पास झाले. असून हा रस्ता साठी सतरा लक्ष रुपये खर्च असून सदरील काम हे आज चालू करण्यात आले होते . गुणोत्तर मार्फत खड्या मध्यो पाणी असताना देखील खडी व डांबर टाकण्याचे काम चालू होते हे काम गावकऱ्यांच्या निदर्शनात आले . या वेळी स्थानिक ग्रामस्थांनी रस्ता अडवून चांगल्या प्रकारे काम करावे असे गुत्तेदारांना विनंती केली. या वेळी युवा नेते राहुल शिंदे व अशोक शिंदे यांनी

**गावकऱ्यांनी काम पाडले बंद, उत्कृष्ट पद्धतीने काम न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा– राहुल शिंदे**

वतीने सदरील काम बंद करण्यात आले आहे जोपर्यंत हे रस्त्याचे खड्डे चांगल्या प्रकारे बनवण्याचे काम चांगले होणार नाही तोपर्यंत आम्ही काम होऊ देणार नाही असे या गावकऱ्यांनी गुत्तेदार व संबंधित इंजिनिअर यांच्याशी फोनवर बातचीत करून हे काम बंद पाडले. व चांगल्या प्रकारे काम न केल्यास आंदोलन करण्यात येईल असा इशारा देखील देण्यात आला.

## ड्रोनद्वारे फवारणी : टाकळसिंगचे प्रगतशील शेतकरी जगताप यांचे तूर पिक जोमात

आष्टी । शरद रेडेकर

आष्टी तालुक्यात यावर्षी जोरदार पाऊस झाला आहे. पूर परिस्थिती निर्माण झालीअतिवृष्टी व महापुराने प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असले तरी ज्या शेतकऱ्यांनी तूर पेरणी केली होती व ज्यांचे तूर पिक वाहून गेले नाही. अशा शेतकऱ्यांची तुरीचे पीक सध्या जोमात असून सहा ते सात फुटापर्यंत तुरीची वाढ झाली आसून त्यामुळे फवारणी कशी करायची असा प्रश्न शेतकऱ्यांकडे पडत असताना तालुक्यातील टाकळसिंग येथील व माजी आमदार भीमराव धोंडे यांचे स्वीय सहाय्यक दादासाहेब जगताप यांचे वडील नागनाथ जगताप यांनी आपल्या दोन एकर तुरीच्या पिकांवर ड्रोनच्या सहाय्याने फवारणी करुन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत शेतीकडे वळले आहेत.



दिवसेंदिवस शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन शेती करीत आहेत परंतु त्यांना पाहिजे त्याप्रमाणात निसर्गाची साथ मिळत नाही.ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे.

आष्टी तालुक्यातील टाकळसिंग येथील व्हा. चेअरमन नागनाथ पांडुरंग जगताप यांनी अतिशय कष्टातून शेती फुलवली आहे. नागनाथ यांना दोन मुले आहेत. मोठा मुलगा संतोष दुध व्यवसायात आहे. एकुण १४ गायी असुन ९५ लिटर दुध डेअरीला जात आहे. त्यांचा दुसरा मुलगा दादासाहेब हा शिक्षण महर्षी व माजी आमदार भीमराव धोंडे यांच्याकडे स्वीय सहाय्यक म्हणून कार्यरत आहेत. काबाडकष्ट करून या कुटुंबाने स्वतःचे अस्तित्व निर्माण करून चिकाटीने व जिद्दीने कुटुंब स्टेबल झाले आहे. कोरोनाच्या काळात सुद्धा जगताप कुटुंबाने गोरगरीब लोकांना मदतीचा हात दिला होता. गरिबीची जाण असणारे कुटुंब आहे. आज रोजी तुरीचे दोन एकर पिक व लिंबूची तीन एकर बाग तसेच सीताफळाचे अडीच एकर क्षेत्र आहे. पंचक्रोशीतील लोकांनी या कुटुंबाचा आदर्श घ्यावा अशा प्रकारे शेती विकसित केली आहे.

सेवानिवृत्त कृषी अधिकारी सुपेकर व तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत असल्याचे दादासाहेब जगताप यांनी सांगितले.

## सत्तेचा उपयोग दर्जेदार विकास कामांसाठीच होईल - अमरसिंह पंडित

गेवराई । प्रतिनिधी

शासकीय योजनेतुन वैयक्तीक लाभ देतांना कधीच पक्ष, जात, धर्म याचा विचार केला नाही, सत्तेचा उपयोग सदैव दर्जेदार विकास कामांसाठीच होईल असा विश्वास माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केला. माजी पं.स.सदस्य अनिल पवळ यांच्या पक्ष प्रवेश प्रसंगी ते बोलत होते. या पक्ष प्रवेश सोहळ्यामुळे अमरसिंह पंडित यांनी आमचे कुटूंब एकत्रित आणले अशी भावना अनिल पवळ यांचे बंधु सुभाष पवळ यांनी व्यक्त केली. तुम्ही सत्तेसाठी पक्ष सोडला आम्ही स्वाभिमाना साठी राष्ट्रवादीत आलो अशी खोचक टिका सरपंच कालिदास नवले यांनी केली. गेवराई येथील




कार्यक्रमात शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपाला सोडचिठ्ठी देवुन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश केला.

भारतीय जनता पार्टीचे कोळगांव गणातील माजी पं.स.सदस्य अनिल पवळ, सिरसमार्गचे सरपंच सुरेश मार्कड, ग्रा.पं.सदस्य महारुद्र वखरे, गोकुळ जाधव, विश्वांभर रडे, भगवान सागडे यांच्यासह त्यांच्या शेकडो समर्थकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवुन रविवार दि. २ नोव्हेंबर रोजी गेवराई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहिर प्रवेश केला. कार्यक्रमाला सिरसमार्ग पंचक्रोशितील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी सुभाष पवळ, भारत तांबारे, प्रल्हाद करांडे, मोहनराव पवळ, सोमेश्वर गचांडे आणि कालिदास नवले आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी जयभवानीचे माजी व्हा.चेअरमन आप्पासाहेब औटी, विठ्ठलराव शेळके, पांडुरंग गाडे, कुमारराव ढाकणे, बाजार समितीचे सभापती जगन्नाथ काळे, माजी सभापती मुजीब पठाण, पांडुरंग कोळेकर, जगन्नाथ शिंदे, सुभाषराव पवळ, किशोर कांडेकर, कालिदास नवले, जालिंदर पिसाळ, मदनराव घाडगे, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष जयदिप औटी, राजाभाऊ वारंग, बळीराम रसाळ, विकास सानप, माजी नगराध्यक्ष विनोद सौंदरमल, शेख खाजाभाई, दादासाहेब घोडके, उपसभापती श्रीहरी पवार आदींसह मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते.

## आष्टी तालुक्यातील पदवीधरांनी मोठ्या संख्येने नावनोंदणी करावी –अविनाश कदम

आष्टी । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर पदवीधर मतदार संघांची निवडणुक जाहीर झाल्यानंतर नावनोंदणी सुरू झाली होती पण अंतिम तारीख ६ नोव्हेंबर रोजी असल्याने नोंदणीसाठी फक्त तीन दिवस शिल्लक असल्याने उर्वरित सर्व पदवीधर मतदारांनी मोठ्या संख्येने नावनोंदणी करून घेण्याचे आवाहन मराठी पत्रकार परिषद संलग्न आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम यांनी केले आहे.

ही नावनोंदणी सर्वच पदवीधर मतदारांसाठी अनिवार्य आहे. ज्यांनी मागील निवडणुकीत आपले नाव



नोंदवून घेतले होते, त्यांनासुद्धा यावेळी नव्याने नावनोंदणी करणे गरजेचे आहे. १ नोव्हेंबर २०२२ पूर्वी पदवी प्राप्त झालेले सर्व विद्यार्थी या मतदारसंघात मतदान करू शकतात त्यांनी नावनोंदणीसाठी नमुना अर्ज क्र. १८ संपूर्ण निळ्या किंवा काळ्या शाईने मराठी किंवा इंग्रजी भाषेत भरलेला आणि कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या पदवी प्रमाणपत्राची किंवा पदवीच्या अंतिम वर्षाच्या मार्कशीटची झेरॉक्स प्रत व एक पासपोर्ट साईज फोटो, अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी दुसरा फोटो चिटकवून ठेवावा आणि मतदान ओळखपत्र किंवा आधार कार्ड यापैकी एकाची प्रत व सर्व कागदपत्रे घेऊन अर्ज आष्टी येथील तहसील कार्यालयातील निवडणूक विभागात सादर करावे. अर्जासोबत दिलेले फोटो स्टेपल करून द्यावा तसेच ओळखपत्राची प्रत पारदर्शक करून द्यावी.फक्त तीन दिवस शिल्लक असल्याने, सर्व उर्वरित पदवीधर मतदारांनी लगेच आपले नावनोंदणी अर्ज दाखल करावेत असे आवाहन मराठी पत्रकार परिषद संलग्न आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, उपाध्यक्ष जावेद पठाण, सचिव गहिनीनाथ पाचबेल, कार्याध्यक्ष अक्षय विधाते, प्रा. निसार शेख, संपादक सय्यद बबलु, पत्रकार समीर शेख, ड. किशोर निकाळजे, जेष्ठ पत्रकार राजेंद्र लाड, पत्रकार संतोष नागरगोजे, प्रेम पवळ, अतुल जवणे, कृष्णा पोकळे, मारूती सत्रे, सोपान पगारे, आदिनाथ ठोंबरे आदींनी केले आहे.

पान ६ वरून...

### धुमेगाव शिवारात

४९०.७० किलो ग्राम गांजा कि.अं. १,३७,३९,६००/– रु अंमली पदार्थ गांजाचा मुद्देमाल मिळुन आला असुन तो पंचासमक्ष जप्त करण्यात आला आहे. आरोपी नामे नारायण शेषेराव मगर रा. धुमेगाव ता. गेवराई यास ताब्यात घेण्यात आले असून दोन आरोपी विरुध्द पो.स्टे. चकलंबा गुरनं ३७६/२०२५ कलम ८ (), २०(), २०()(), २०() () गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये सरकार तर्फे दिनांक ०२/११/२०२५ रोजी फिर्याद नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारावाई ही नवनीत काँवत पोलीस अधिक्षक, बीड, सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक, बीड, अनिल कटके उपविभागीय पोलीस अधिकारी गेवराई यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक शिवाजी बंटेवाड (स्थागुशा), सपोनि गडवे, पोउपनि अजय पानपाटील (चकलंबा), स्थागुशा पथकातील पोह गोविंद राख, अंकुश वरपे, विकास राठोड, युनूस बागवान, चापोशि/ सुनिल राठोड तसेच चकलांबा पो.स्टे.चे पोना/ कैलास गुजर व अंमलदार व महसुल विभागाचे चकलंबा मंडळ अधिकारी व तलाठी यांनी मिळून केली आहे. बीड पोलीस दलातर्फे बीड जिल्हा नशामुक्त करण्याचे उद्देशाने विशेष सेल स्थापन करण्यात आले असून संपर्कासाठी ९२७०२४३२०० मोबाईल क्रमांक उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. गांजा, अफु किंवा इतर अंमली पदार्थ विक्री वाहतूक किंवा वापर तसेच नशेचे औषध, गोळया, व्हाईटनर याचा साठा वाहतूक विक्री या विषयी माहिती असल्यास सदर क्रमांकावर माहिती कळविण्यासाठी बीड जिल्हा पोलीस दलातर्फे आवाहन करण्यात येत आहे. अंमली पदार्थाची माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव व मोबाईल क्रमांक पुर्णपणे गोपनिय ठेवण्यात येणार आहे.

### पटेल मित्र परिवारातर्फे

असलम पटेल, मोहम्मद पटेल, मुखिद पटेल, मुस्तफा पटेल सरपंच,व इतर मान्यवर उपस्थित होते. त्यांनी रक्तदात्यांचे आणि आयोजक पटेल मित्र परिवाराचे कौतुक केले.

या शिबिरामुळे बीडमधील रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा साठा वाढण्यास मदत होणार असून, पटेल मित्र परिवाराचा हा सामाजिक उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

### सीना नदीवरील खडकत

महामंडळ छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त प्रयत्नांतून हे काम पूर्णत्वास आले आहे.दिवाळीचा सण असतानाही आणि रात्री उशिरापर्यंत सर्व मशीन ऑपरेटर व कामगारांनी न थकता परिश्रम घेतले, हा खऱ्या अर्थाने सेवा आणि बांधिलकीचा आदर्श ठरला आहे.या कामात आ. सुरेश धस यांचे नेतृत्व, महसूल विभागातील आष्टीचे तहसीलदार वैशाली पाटील व कर्जत तहसीलदार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या बंधाऱ्याच्या पुनर्निर्माणामुळे परिसरातील हजारो शेतकऱ्यांना आता येणाऱ्या उन्हाळ्यात पाण्याची भीती नाही. त्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा समाधान आणि आशेचे हास्य फुलले असल्याने नाम फाउंडेशन व आ.सुरेश धस यांचे आभार मानले जात आहेत.

### केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या प्रमुख

पाटील, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित असतील. सदरील कार्यक्रमास राज्यातील ३५ ते ४० हजार शेतकरी उपस्थित राहणार आहेत. मागील अनेक दिवसांपासून कार्यक्रमाची जोरदार तयारी सुरू आहे. आलेल्या शेतकऱ्यांना बसण्यासाठी वॉटरप्रूफ मंडप उभारण्यात येत आहे तर येणाऱ्या मान्यवरांचे हेलिकॉप्टर उतरवण्यासाठी कार्यक्रमस्थळीच हेलिपॅडची व्यवस्था करण्यात येत आहे. कृषीकुल प्रशिक्षण केंद्र सिरसाळा येथे जिल्हाधिकारी यांनी घेतलेल्या प्रशासकीय आढावा बैठकीस उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण, नगर पालिका, तालुका कृषी अधिकारी, पंचायत समिती आरोग्य विभाग आदींसह अनेक शासकीय विभागांचे कार्यालयीन प्रमुखांची उपस्थिती होती.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय कौतुकास्पद –नवनाथ शिराळे

बीड । प्रतिनिधी

सध्या केंद्रामध्ये भारतीय जनता पार्टीचे मा श्री नरेंद्रजी भाई मोदी साहेब यांचे सरकार असून देशातील गोरगरीब सर्वसामान्य वंचित लोकांपर्यंत मोठ्या मोठ्या शासकीय योजना कशा पोहोचल्या जातील व त्यांना कसा लाभ मिळवून देण्यामध्ये यशस्वी ठरलेले मा पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी साहेब एक यशस्वी पंतप्रधान म्हणून सध्या जगभरामध्ये ओळखल्या जाऊ लागले आहेत.ते सातत्याने गोरगरीब लोकांना सर्व योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील व यशस्वी मा पंतप्रधान यांनी केलेले प्रयत्न सातत्याने यशस्वी होत.असून केंद्र सरकारच्या बाबतीत सर्वत्र जगभरा मधून कौतुक व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यामध्ये महायुतीचे सरकार असून या महायुतीचे कर्तव्यदक्ष आणि कर्तबदार सर्वांच्या मनामध्ये बसलेले देव देश आणि धर्म यासाठी सातत्याने आपले कर्तव्य पार पाडणारे असे उत्कृष्ट आणि सुसंस्कृत स्वतः वकील असलेले अभ्यासू व्यक्तिमत्व असलेले महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मा मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या बाबतीत येणाऱ्या २०२६ मध्ये पूर्णपणे कर्जमाफी करु असे अभ्यासपूर्वक वचन सर्व महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांना त्यांनी दिल्यामुळे शेतकऱ्यांना एक फार मोठा धीर त्यांनी दिला आहे. म्हणून या शेतकऱ्याच्या घेतलेल्या कर्जमाफीच्या निर्णयाच्या बाबतीत मा मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस साहेब यांच्या उत्कृष्ट कार्याचे बीड जिल्ह्यातील शेतकरी पुत्र तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी समाधान व्यक्त करून बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने व सर्व बीड जिल्ह्यातील तमाम शेतकऱ्यांच्या वतीने त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी महाराष्ट्रातील तमाम लाडक्या बहिणींसाठी लाडकी बहीण नावाची चांगल्या प्रकारची महाराष्ट्रातील गोरगरीब महिलांना माता भगिनींना एक आधार देणारी योजना सुरू केली आहे. तसेच दिव्यांग व्यक्तीच्या बाबतीत देखील त्यांनी एक हजार रुपये मानधन वाढवले आहे.आता दिव्यांग व्यक्तीला पहिले दीड हजार रुपये मासिक महिना मिळत होता परंतु देवा भाऊ यांनी एक हजार रुपयांची भर या योजनेमध्ये टाकल्यामुळे प्रत्येकी दिव्यांग व्यक्तीला संजय गांधी निराधार योजनेच्या माध्यमातून अडीच हजार रुपये महिना मिळू लागला आहे. याबाबतीत देखील महाराष्ट्रातील तमाम दिव्यांग बांधवांमधून देखील समाधान व्यक्त होत असल्याचे या प्रसिद्ध पत्रकाच्या माध्यमातून शेतकरी पुत्र तथा भारतीय जनता पार्टीचे नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे. येणाऱ्या भविष्य काळामध्ये आपण बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील खेड्यापाड्यांमध्ये जाऊन देखील भारतीय जनता पार्टीची शाखा सर्वत्र गावोगाव करणार आहोत.तसेच भारतीय जनता पार्टीचे कार्य देखील आपण सर्वसामान्य माणसांना या शाखा ओपनिंगच्या माध्यमातून सांगणार आहोत. आणि शेतकऱ्यांच्या घेतलेल्या कर्जमाफीच्या योजनेच्या निर्णयाच्या बाबतीत सर्व शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत असून आता पुढेही येणाऱ्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीची सत्ता महाराष्ट्र मध्ये सर्वत्र येईल व भविष्यात लोकहिताचे चांगल्या प्रकारे निर्णय घेणारे अभ्यासू व्यक्तिमत्व असलेले कायमस्वरूपी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देखील देवेंद्र जी फडणवीस साहेब हेच असावेत अशी चर्चा देखील आता सर्व शेतकरी बांधवांमधून होत आहे.असे प्रसिद्धस दिलेल्या पत्रकाच्या माध्यमातून शेतकरी पुत्र तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे तसेच रब्बी पिकाचा सर्व बीड जिल्ह्यातील तमाम शेतकरी बांधवांनी आपापला विमा काढून स्वतःचा फायदा कसा होईल किंवा शासनाच्या धोरणामध्ये सहभागी होऊन रब्बीचा पीक विमा सर्व बीड जिल्ह्यातील तमाम शेतकरी बांधवांनी मुद्दतीच्या आत आपापले पैसे भरावेत विमा काढून घ्यावा घ्यावा असे आवाहन शेतकरी पुत्र तथा भाजप नेते मा नवनाथ जी अण्णा शिरोळे पाटील यांनी केले आहे आणि भविष्यात देवा भाऊ नक्कीच शेतकऱ्यांना रब्बी पीक विमाच्या बाबती देखील विमा कंपनीच्या माध्यमातून भरपूर शेतकऱ्यांच्या हिताची व शेतकऱ्याला आर्थिक मदत करून देतील असा विश्वास ही या वेळी नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी व्यक्त केला व मा श्री देवा भाऊ फडणवीस साहेब यांच्या महायुती सरकारच्या बाबतीत समाधान व्यक्त केले .



# 'वनामकृवि'त स्थापन होणार शेतीतील जोखीम व्यवस्थापन केंद्र

परभणी : हवामान बदलामुळे ढगफुटी, गारपीट, उष्णतेची लाट यांसारखी संकटे आता सातत्याने येत आहेत. त्यातून न्यू नॉर्मल (नवीन सामान्य) ही संकल्पना उदयास आली आहे. यामुळे शेती व्यवसायापुढे उद्भवलेल्या जोखीमेची उकल करून त्यावर उपाय सुचविणे गरजेचे झाले आहे. त्यादृष्टीने आवश्यक देशातील पहिले शेतीतील जोखीम व्यवस्थापन परभणी येथील केंद्र वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठामध्ये (वनामकृवि) स्थापन करण्याचा निर्णय शनिवारी (ता.१) पार पडलेल्या विशेष बैठकीत घेण्यात आला.

न्यू नॉर्मल वैज्ञानिक व धोरणात्मक संकल्पनेनुसार विचार मंथन करण्यासाठी कृषी अर्थशास्त्र विभागातर्फे आयोजित बैठकीच्या अध्यक्षस्थानी राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष आणि मुख्यमंत्री पर्यावरण संतुलित विकास टास्क फोर्सचे कार्यकारी अध्यक्ष पाशा पटेल होते. कुलगुरू डॉ. इंद्रमणी मिश्रा, शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार, संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रवीण वैद्य, डॉ. विश्वनाथ खंदारे, कृषी अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सचिन मोरे, मृदाविज्ञान व कृषी रसायनशास्त्र विभागप्रमुख



डॉ. हरिहर कौसडीकर, विस्तार शिक्षण विभागप्रमुख डॉ. राजेश कदम, कृषी कीटकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. पुरुषोत्तम नेहरकर, कृषी हवामानशास्त्र विभागाचे शास्त्रज्ञ कैलास डाखोरे, कृषिविद्यावेत्ता डॉ.अरविंद पंडागळे, डॉ. आनंद गोरे, डॉ. विलास खर्गखराटे, डॉ. मदन पेंडके, डॉ. सुनील उमाटे, डॉ. गजानन गडदे, डॉ. शिवाजी शिंदे, कृषि परिषदेचे कार्यकारी परिषद सदस्य श्री. जनार्दन कातकडे, डॉ. रणजित चव्हाण उपस्थित होते. पटेल म्हणाले, की यंदा अतिवृष्टीमुळे मराठवाड्यात सर्वाधिक नुकसान झाले. जागतिक तापमानवाढीचा फळपिकांनाही धोका निर्माण झाला आहे. या स्थितीत शेती व शेतकरी टिकून राहण्यासाठी कृषी विद्यापीठातील सर्व विभागांतील शास्त्रज्ञांनी एकत्र येऊन उपाययोजना कराव्या लागतील. कायमस्वरूपी संरचना उभारावी लागेल. डॉ. इंद्रमणी म्हणाले, की नैसर्गिक संकटामुळे शेती व पिकांचे नुकसान भविष्यातही सातत्याने होऊ शकते. या जोखीमेचा उत्पादन खर्चात समावेश करावा लागेल. मागील ५० वर्षांतील आकडेवारीच्या आधारे आगामी ५० वर्षांसाठी संशोधनाची दिशा निश्चित करावी, कमी कालावधीत येणारे, अति पाण्यात तग धरून राहणारे तसेच यांत्रिकी पद्धतीने काढणीसाठी योग्य वाण विकसित करण्यावर भर द्यावा लागेल.

## गाई- म्हशिंच्या डोळ्यातून पाणी येत असल्यास दुर्लक्ष करू नका !



गाईच्या डोळ्यातून पाणी येणे म्हणजे एक साधं लक्षण वाटतं, पण त्यामागे अनेक गंभीर कारणं दडलेली असू शकतात. वेळेवर उपचार न केल्यास गाईच्या आरोग्यावर, उत्पादनक्षमतेवर आणि शेवटी शेतकऱ्याच्या उत्पन्नावरही परिणाम होऊ शकतो. डोळ्यांतून पाणी येण्याची कारणे : डोळ्यात धूळ, परगळी, काड्या-कचरा गेलेला असणे. डोळ्यांमध्ये काही परकं कण गेल्यास गाईला अस्वस्थ वाटते आणि डोळ्यातून सतत पाणी वाहू लागते.

डोळ्यांचा संसर्ग : डोळे लालसर होतात, सुजतात, आणि पाणी येतं. हा संसर्ग एकापासून दुसऱ्याला होऊ शकतो. इन्फेक्शनमुळे डोळा दुखणे अशा स्थितीत डोळ्याच्या आतील भागात इन्फेक्शन झाल्यामुळे डोळा पाणावतो. काही वेळा फुफ्फुसात किंवा नाकात कृमी असतील, तर त्याचा त्रास डोळ्यांतून पाणी येण्यामार्फत दिसू शकतो.माशी-मच्छर यांचा त्रास : डोळ्याभोवती माशा सतत बसल्यामुळे डोळ्यात जंतू जातात आणि त्यामुळे डोळे पाणावतात. टिक किंवा दुसरे परजीवी डोळ्याभोवती असणे, ह्यामुळे इरिटेशन होऊन पाणी वाहू शकते. ॲलर्जीक प्रतिक्रिया : काही नवीन खाद्यपदार्थ, गोठा स्वच्छ नसेल, रसायनांचा संपर्क यामुळे डोळ्यांची ॲलर्जी होऊन पाणी येऊ शकते.

अशी आहेत लक्षणे : डोळ्यातून पाणी सतत येणे, डोळा सुजलेला/लालसर दिसणे, डोळ्याजवळ चोळणे किंवा डोकं झाडांना घासणे, डोळा अर्धवट बंद ठेवणे, खाण्याचा/दूध देण्याचा रुचीत बदल होणे.

उपाय आणि काळजी : प्राथमिक स्वच्छता करा. स्वच्छ पाण्याने डोळे हलक्या हाताने धुवा. गरज असल्यास स्वच्छ सुती कापड वापरा. व्हेटरिनरी डॉक्टरांचा सल्ला घ्या. डोळ्यांतून पाणी २ दिवसांपेक्षा जास्त येत असेल, तर डॉक्टरांकडून तपासणी करून औषधं सुरू करा. गोठा स्वच्छ ठेवा. धूळ, माशा, टिक यापासून संरक्षण होईल.

माशी नियंत्रण उपाय करा. नेहमी कीटकनाशक फवारणी, लोळण औषध यांचा वापर करा. आहारात सुधारणा करा. डोळ्यातून पाणी येणं हे एका मोठ्या त्रासाचं पूर्वलक्षण असू शकतं. त्यामुळे ते वेळीच ओळखणं, योग्य उपचार करणं आणि गोठा स्वच्छ ठेवणं ही शेतकऱ्यांची जबाबदारी आहे.

## हरभरा लागवडीसाठी करा 'या' सुधारीत वाणांची निवड

हरभरा पिकाच्या चांगल्या उत्पादनासाठी योग्य वाणांची निवड करणे महत्त्वाचे आहे. हे पीक प्रामुख्याने रब्बी हंगामात घेतले जाते. सोयाबीनची कापणी केल्यानंतर बरेचसे शेतकरी हरभरा लागवडीसाठी सुधारीत वाणांची निवड पिकाची लागवड करतात. हरभरा पिकासाठी जमिनीची निवड महत्त्वाची आहे. हरभरा पिकासाठी मध्यम ते भारी काळी व निचरा होणारी जमीन असावी. सिंचनाची व्यवस्था असल्यास मध्यम प्रकारच्या जमिनीतही हरभरा पीक चांगल्या प्रकारे येऊ शकते.

लागवड कधी करावी? : २० ऑक्टोबरनंतर पावसाचे प्रमाण कमी झालेले असते आणि थंडीला सुरुवात झालेली असते, वातावरणात तापमानही जास्त असते अशा वातावरणात हरभऱ्याची पेरणी केल्यास उगवण चांगल्या प्रकारे होते. असे हवामान हरभरा पिकाच्या लागवडीसाठी योग्य असते. मात्र योग्य वाणांची निवड करणे महत्त्वाचे असते.

सुधारीत वाण : विजय- अधिक उत्पादन क्षमता, मररोग प्रतिकारक जिरायत, बागायत तसेच उशिरा पेरणीसाठी योग्य आहे. तसेच हा वाण अवर्षण प्रतिकारक्षम आहे. या वाणाचा कालावधी जिरायतीसाठी ८५ ते ९० तर बागायतीसाठी १०५ ते ११० दिवस इतका आहे. या वाणापासून क्विंटल प्रतिहेक्टर उत्पादन मिळते. विशाल - ११० ते ११५ दिवसात येणारा हरभऱ्याचा वाण असून जिरायतीसाठी १३ क्विं./हे. तर बागायतीसाठी २० क्विं./हे. उत्पादन मिळते. हा वाण मर रोगास प्रतिकारक्षम आहे. विराट - हा काबुली वाण आहे. हा वाण मर रोगास प्रतिकारक्षम असून याचे दाणे टपोरे आहेत. या वाणापासून जिरायतीमध्ये ११ क्वि./हे. तर बागायतीमध्ये १९ क्विं./हे. उत्पादन मिळते. दिग्विजय - हा वाण जिरायतीसाठी ९० ते ९५ तर बागायतीमध्ये १०५ ते ११० दिवसांत तयार होतो. जिरायतीमध्ये १४ क्विं./हे. तर बागायतीमध्ये २३ क्विं./हे. उत्पादन मिळते. हा वाण जिरायत, बागायत तसेच उशिरा पेरणीसाठी योग्य असून मररोग प्रतिकारक आहे. कृपा - हा १०५ ते ११० दिवसात येणारा वाण आहे. या वाणापासून सरासरी १८ क्विं./हे. उत्पादन मिळते. जास्त टपोरे व पांढऱ्या रंगाचे दाणे असणारा हा वाण आहे. फुले विक्रम - या वाणापासून जिरायतीमध्ये १६ क्वि./हे. तर बागायतीमध्ये २२ क्विं./हे. इतके सरासरी उत्पादन मिळते. या वाणाचा वाढीचा कल उंच असल्यामुळे यांत्रिक पद्धतीने (कंबाईन हार्वेस्टरने) काढणी करण्यास उपयुक्त आहे. या वाणाची उत्पादनक्षमता अधिक असून मर रोग प्रतिकारक आहे. फुले विक्रम हा वाण जिरायत, बागायत तसेच उशिरा पेरणीसाठी योग्य आहे.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८१७ : कॅनडातील सर्वात जुनी चार्टर्ड बँक बँक ऑफ मॉन्ट्रियल सुरु झाली.
१९३८ : पाचे इंग्लिश दैनिक 'द बॉम्बे टाइम्स अँड जर्नल ऑफ कॉमर्स' या नावाने मुंबईत सुरू झाले.
१९०३ : पनामा (कोलंबियापासुन) स्वतंत्र झाला.
१९११ : शेवरोलेट ऑटोमोबाइल कंपनी सुरु झाली.
१९१३ : अमेरिकेत 'आय कर' सुरू झाला.
१९१८ : पोलंड (रशियापासुन) स्वतंत्र झाला.
१९४४ : भारतीय संगीत प्रचारक मंडळातर्फे पुण्यात अखिल भारतीय संगीत परिषदेस सुरुवात.
१९४९ : वाढत्या किमती विरुद्ध निषेध व्यक्त करण्याकरता पुण्यात बाराशे स्त्रियांचा कलेक्टर कचेरीवर मोर्चा.
१९५७ : रशियाच्या 'स्पुटनिक-२' या अंतराळयानातून गेलेली 'लायका' नावाची कुत्री ही अंतराळभ्रमण करणारी पहिली सजीव ठरली. मात्र प्रक्षेपणानंतर काही तासांतच ती मृत्यूमुखी पडली.
१९८८ : श्रीलंकेतून आलेल्या भाडोत्री तामिळ सैनिकांनी मालदीववर हल्ला केला. तेथील सरकारच्या विनंतीवरुन भारतीय सैन्याने तो मोडून काढला व सरकार वाचवले
२०१४ : वन वर्ल्ड ट्रेड सेंटर अधिकृतपणे सुरु झाले.


### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६८८ : सवाई जयसिंग जयपूर संस्थानचा राजा (मृत्यू: २१ सप्टेंबर १७४३)
१९०० : ॲडिडास चे संस्थापक एडॉल्फ डॅस्लर यांचा जन्म. (मृत्यू: ६ सप्टेंबर १९७८)
१९०१ : पृथ्वीराज कपूर अभिनेते, निर्माते व दिग्दर्शक (मृत्यू: २९ मे १९७२)
१९१७ : भारतीय स्वतंत्रसैनिक अन्नपूर्णा महाराणा यांचा जन्म. (मृत्यू: ३१ डिसेंबर २०१२)
१९२१ : चार्ल्स ब्रॉन्सन अमेरिकन अभिनेता (मृत्यू: ३० ऑगस्ट २००३)
१९२५ : प्रबंधलेखक, संपादक डॉ. हे. वि. इनामदार यांचा जन्म.
१९३३ : अमर्त्य सेन कल्याणाभिमुख अर्थशास्त्र व सामाजिक पर्याय सिद्धान्त या विषयांतील कार्यासाठी नोबेल पारितोषिक विजेते (१९९८) अर्थशास्त्रज्ञ
१९३७ : लक्ष्मीकांत शांताराम कुडाळकर चित्रपटसृष्टीत चार दशके लोकप्रिय संगीत देणाऱ्या 'लक्ष्मीकांत-प्यारेलाल' या जोडीतील संगीतकार (मृत्यू: २५ मे १९९८)
१९५४ : लक्ष्मीकांत बेर्डे अभिनेता (मृत्यू: १६ डिसेंबर २००४)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८१९ : अनंत फंदी शाहीर, 'फटका'कार, गोंधळी (जन्म: ? ? १७४४)
१८९० : स्विस नॅशनल कौन्सिलचे पहिले अध्यक्ष ओरिचिक ओशेनेबेविन यांचे निधन. (जन्म: २४ नोव्हेंबर १८११)
१९९० : मनमोहन कृष्ण चरित्र अभिनेता (जन्म: २६ फेब्रुवारी १९२२)
१९९२ : प्रेम नाथ हिन्दी चित्रपटात नायक व खलनायकाच्या भूमिका गाजवणारे अभिनेते (जन्म: २१ नोव्हेंबर १९२६)
१९९८ : डॉ. आर. सी. हिरेमठ कन्नड साहित्यिक, कर्नाटक विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म: १५ जानेवारी १९२०)
१९९८ : बॅटमॅन पत्राचे निर्माते बॉब केन यांचे निधन. (जन्म: २४ ऑक्टोबर १९१५)
२००० : प्रा. गिरी देशिंगकर चीनविषयक तज्ञ आणि पूर्व आशियाई घडामोडींचे अभ्यासक (जन्म: ? ? ????)
२०१२ : कैलाशपती मिश्रा गुजरातचे राज्यपाल (जन्म: ५ आक्टोबर १९२३)

## नोव्हेंबर महिन्यात तूर पिकावरील एकात्मिक नियंत्रण




सध्या तूर पिकात फुलोरा ते शेंगा भरण्याची अवस्था सुरु आहे. या काळात पिकावर वेगवेगळ्या किडीं आणि रोगांचा प्रादुर्भाव दिसून येतो. या किडी आणि रोगांचे वेळीच नियंत्रण केले नाही तर पीक उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. जाणून घेऊ एकात्मिक नियंत्रण उपाय.

तूर पिकाचे कीड आणि रोग व्यवस्थापन : पीक फुलोऱ्यापासून ते शेंगा तयार होण्याच्या अवस्थेत असताना तूर पिकाला आवश्यकतेनुसार आणि उपलब्धतेनुसार पाणी द्यावे. रसशोषक आणि इतर किडींचा अंदाज घेऊन प्रति हेक्टरी ५ याप्रमाणे कामगंध सापळे लावावेत. शेतात पक्षांना बसण्यासाठी मचाण म्हणजेच इंग्रजी ''टी'' आकाराचे पक्षी थांबे प्रति हेक्टरी ५० ते ६०. उभारावेत. तूर पिकामध्ये वांझ रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच, रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत. तुरीत वांझ रोगाचा प्रसार कोळी किडीमार्फत होतो म्हणून त्याच्या नियंत्रणासाठी ॲझाडीरॅक्टिन (३०० पीपीएम) ५ मिलि प्रति लिटर पाणी किंवा पाण्यात विरघळणारे गंधक (८० डब्ल्यूपी) २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फुलोरा आणि शेंगा भरण्याच्या अवस्थेत घाटेअळी/पसारी पतंग आणि फळमाशीच्या नियंत्रणासाठी निंबोळी अर्क (५ टक्के) किंवा ॲझाडिरेक्टीन (३०० पीपीएम) ५० मिलि किंवा इमामेक्टीन बेन्झोएट (५ एसजी) ४.४ मिलि किंवा क्लोरअॅन्ट्रानिलीप्रोल (१८.५ टक्के एससी) २ ते ३ मिलि प्रति १० लिटर पाणी फवारणी करावी. तूर पिकात तृणधान्याचे आंतरपीक घेतल्यास किडींचे प्रमाण कमी राहण्यास मदत होते. एच.एन.पी.व्ही. या जैविक कीडनाशकाचा वापर करावा.

# अंजीराची शेती देते भरघोस उत्पन्न

भारतात अंजीर पिकवणे शेतकऱ्यांसाठी खरोखरच महत्त्वाचे आहे कारण ते विकून भरपूर पैसे कमवू शकतात. अंजीर देखील आपल्यासाठी खरोखर चांगले आहे आणि आपल्याला निरोगी ठेवण्यास मदत करू शकते. अंजीरमध्ये जीवनसत्त्वो आणि फायबरसारख्या अनेक चांगल्या गोष्टी असतात. आपण ते ताजे किंवा वाळलेले खाऊ शकता. अंजीराच्या अनेक जाती विकसित केल्या आहेत. काही चांगल्या जाती खालीलप्रमाणे आहेत, पंजाब अंजीर, पुणे अंजीर, मार्शलीस अंजीर, पुणेरी अंजीर. अंजीर वाढवण्यासाठी, तुम्हाला उबदार, कोरडे हवामान आणि चांगली माती असलेली जागा आवश्यक आहे जी खूप ओली नाही. मातीमध्ये विशिष्ट प्रमाणात आंबटपणा असणे आवश्यक आहे आणि त्यातून पाणी सहजपणे वाहून गेले पाहिजे. अंजीरांना चांगली वाढ होण्यासाठी आणि भरपूर फळे येण्यासाठी



२५ ते ३५ अंश तापमानाची आवश्यकता असते.

फील्ड तयारी : अंजीर पिकवण्यासाठी मोकळी माती लागते. सर्व प्रथम, रोपाचे जुने भाग विशेष मशीनने काढून शेत स्वच्छ करा. नंतर, माती फोडण्यासाठी आणि मोकळी करण्यासाठी दुसरे मशीन वापरा. यानंतर, शेत गुळगुळीत करून सपाट करा. यानंतर, जमिनीत सुमारे ५ मीटर अंतरावर खड्डा खणणे. शेवटी या खड्ड्यांमध्ये अंजिराची झाडे लावा आणि त्यांना थोडे पाणी द्या.

पेरणी आणि बियाणे प्रमाण : अंजिराची झाडे हलवण्याची उत्तम वेळ म्हणजे जुलै आणि ऑगस्टमध्ये पावसाळा. हे करण्यासाठी, आपण एकतर रोपे वाढवण्यासाठी स्वतःची जागा बनवू शकता किंवा त्यांची विक्री करणार्या स्टोअरमधून काही खरेदी करू शकता. प्रत्येक मोठ्या क्षेत्रासाठी आपल्याला सुमारे २५० रोपांची आवश्यकता असेल. झाडे एकमेकांपासून ५ मीटर अंतरावर ठेवण्याची खात्री करा.

वनस्पती सिंचन : जेव्हा आपण अंजीर पिकवतो तेव्हा आपल्याला हंगामानुसार वेगवेगळ्या वेळी पाणी द्यावे लागते. जर आपण त्यांना पावसाळ्यात लावले, जे सहसा जुलै आणि ऑगस्टमध्ये असते, तर आपल्याला त्यांना पावसापासून जितके पाणी मिळते तितके पाणी द्यावे लागत नाही. हिवाळ्यात दर १४ ते २० दिवसांनी पाणी द्यावे लागते. उन्हाळ्यात, अंजीरच्या झाडांना भरपूर पाणी लागते, म्हणून आपल्याला आठवड्यातून दोनदा पाणी द्यावे लागते. पावसाळ्यात आपल्याला त्यांना पाणी द्यावे लागत नाही, परंतु जर पुरेसा पाऊस पडला नाही तर आवश्यकतेनुसार पाणी द्यावे लागते.

वनस्पती काळजी : जर तुम्हाला तुमच्या अंजिराच्या झाडांना जास्त फळे द्यायची असतील तर तुम्हाला त्यांची चांगली काळजी घ्यावी लागेल. एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जमिनीत रोपे लावल्यानंतर वर्षभरात रोपांची छाटणी करणे. जेव्हा तुम्ही झाडे कापता तेव्हा त्यावर एक मीटर उंचीपर्यंत नवीन फांद्या वाढणार नाहीत याची खात्री करा. तसेच, कोणत्याही लांब फांद्या कापून टाका. हे रोपाला नवीन शाखा वाढण्यास आणि निरोगी होण्यास मदत करेल, ज्यामुळे त्याला अधिक फळे येण्यास मदत होईल. प्रत्येक उन्हाळ्यात तुमची अंजीर फळे येईपर्यंत छाटून टाकावीत.

# सामाजिक, राजकीय क्षेत्रात राऊत परिवाराचे योगदान महत्त्वपूर्ण-दानवे

## सर्वांच्या उपस्थितीत दीपावली स्नेह मिलन संपन्न

जालना। प्रतिनिधी

स्वातंत्र सैनिक रामभाऊ राऊत यांच्याकडून समाजसेवेचे बाळकडू मिळालेल्या राऊत परिवाराने उद्योग, व्यवसायासोबतच जालना शहराच्या विकासासाठी समाजकारण, राजकारणात महत्वपूर्ण योगदान दिले असून पुढच्या पिढीकडून सुद्धा हा वारसा चालवत जपला जातोय ही समाधानाची बाब असल्याचे मत माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी व्यक्त केले.

माजी उपनगराध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टीचे प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत आणि राऊत परिवाराच्या वतीने शनिवारी ( ता.०१) राऊत नगर येथे आयोजित दीपावली स्नेह मिलन कार्यक्रमास मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली. माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी आपल्या व्यस्त दिनचर्येतून वेळ काढत स्नेहमिलनास भेट देऊन पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत मनसोक्त गप्पा मारल्या. भोकरदन बाजार समिती, पंचायत समिति



,ग्रामपंचायत निवडणुकीतील त्या काळात घडलेल्या गमती -जमतींचे किस्से सांगून पूर्वी ज्वारी हातात धरली की, लोक शब्दाला जगायचे .आता तसे होत नाही, शपथा घेऊन काही जणांच्या देवघरातील मुर्त्या पांढऱ्या झाल्या, अशी मिश्किल टिप्पणी सुद्धा दानवे यांनी केली.

राजेश राऊत यांनी सर्व स्नेहीजनांच्या शुभेच्छा स्वीकारून आभार मानले. सूत्रसंचालन संजय देठे यांनी केले. स्नेह मिलन कार्यक्रमास माजी आमदार कैलास गोरंट्याल, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आ.अरविंदराव चव्हाण ,शिवसेना उ.बा. ठा.चे जिल्हाध्यक्ष भास्करराव अंबेकर, युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर, उद्योजक संजय खोतकर, पंडितराव भुतेकर, नंदकिशोर जांगडे, बबलू चौधरी, विजय कामड , रेल्वे संघर्ष समितीचे अध्यक्ष सुभाष चंद्र देविदान , महासचिव फेरोज अली मौलाना, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, मनपा उपायुक्त केशव कानपुडे, गणेश राऊत, वामनराव राऊत, सतीश पंच,अशोक पांगारकर, इकबाल पाशा, उद्योजक राजेश सोनी, अर्जुन गेही, नरेंद्र मोदी,कैलास लोया, सिद्धिविनायक मुळे ,सुनील पै. खरे, धनराज काबलीये, मेघराज चौधरी,बाला परदेशी, रवी अग्रवाल,संजय मुथा , संजय भरतिया, जीवन सले, राजू माधोवाले, सुनील राठी,राजेंद्र वाघमारे,संदीप नाईकवाडे, विष्णू वाघमारे, तवरावाला,पारस नंद, सोपान पेंढारकर, इंदरचंद तवरावाला,मनीष तवरावाला, रामेश्वर भांदरगे, प्रा.राजेंद्र भोसले, ॲड.दीपक कोल्हे, देवीदास देशमुख, गोवर्धन कोल्हे, राजेश जोशी, शांतीलाल राऊत, गणेश भोसले, मनोज गुळवे,संजय तवरावाला,सतीश बाभळे,रुपेश जैस्वाल, नरेश जैस्वाल, अलोक शाह ,नवीन पटेल ,सुशील पारेक, सतीश जाधव, सागर देवकर, अमोल राऊत,विजय राऊत, सचिन राऊत , सुरेश राऊत,सूर्या राऊत, ॲड .अर्जुन राऊत , यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

---

# अजित पवार काही चुकीचे बोलले नाहीत

## फक्त कर्जमाफी करणे, नुकसानभरपाई देणे हेच सरकारचे काम नाही-पाशा पटेल

परभणी। प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कर्जमाफीवरील वक्तव्यानंतर राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल त्यांच्या समर्थनार्थ उतरले आहेत. ''अजित पवार काही चुकीचे बोलले नाहीत, असे मला वाटते. फक्त कर्जमाफी करणे आणि नुकसानभरपाई देणे हेच सरकारचे काम नाही,'' असे मत त्यांनी व्यक्त केले. पाशा पटेल यांनी अजित पवारांचे समर्थन करताना पाशा पटेल यांनी केलेल्या विधानाने पुन्हा एकदा नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे. अजित पवार यांनी नुकत्याच एका सभेत, ''शून्य टक्के व्याजदराने पैसे दिल्यानंतर शेतकऱ्यांनी कर्ज फेडले पाहिजे, की नेहमीच माफ करा, फुकट द्या अशीच मागणी करणार? असा सवाल केला होता. यानंतर त्यांनी, आम्हाला निवडणुकीत जिंकायचे होते म्हणून आम्ही कर्जमाफीचे बोललो, असे विधान केले होते. या वक्तव्यानंतर विरोधकांनी अजित पवार यांच्यावर जोरदार टीका केली होती. आता पाशा पटेल यांनी अजित पवारांच्या विधानाचे समर्थन केले आहे.

राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांची परभणीत पत्रकार परिषद पार पडली. यावेळी पत्रकारांनी त्यांना अजित पवारांनी केलेल्या विधानाबद्दल प्रश्न विचारला असता, कर्जमाफीबाबत अजित



पवार काही चुकीचे बोलले असे मला वाटत नाही, असे म्हणत पाशा पटेल यांनी अजित पवारांचे एकप्रकारे समर्थन केले. सरकारचे काम फक्त शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणे किंवा नुकसान भरपाई देणे एवढेच आहे का? शेतकऱ्याला अडचणीतून बाहेर कसे काढणे हेदेखील सरकारचं काम आहे. त्यामुळे आम्ही तेच काम करतोय, असेही ते म्हणाले. दरम्यान, पाशा पटेल यांची ही प्रतिक्रिया पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरली आहे. कारण यापूर्वीही त्यांनी अनेकदा वादग्रस्त विधाने केली आहेत. काही महिन्यांपूर्वी त्यांनी शेतकऱ्यांना ''नुकसानीची सवय लावून घ्या,'' असा सल्ला दिला होता आणि ''सरकार प्रत्येक वेळी नुकसानभरपाई देऊ शकत नाही,'' असे वक्तव्य करून संताप ओढवून घेतला होता. आता पुन्हा एकदा त्यांनी कर्जमाफीच्या मुद्द्यावरून अजित पवारांच्या समर्थनार्थ दिलेल्या विधानामुळे राज्यातील राजकीय वातावरण अधिक तापण्याची शक्यता आहे.

---

# पंकजाताई, बालाघाटाच्या डोंगररांगा वाचवा!

## पर्यावरणप्रेमींचे साकडे; महसूल व पोलिस प्रशासनाच्या मदतीने गौण खनिज माफियांचा धुमाकूळ

बीड। प्रतिनिधी

पर्यावरणातील डोंगररांगा, पठारे, टेकड्या यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. निसर्गाने मुक्तहस्ताने उधळलेले हे सौंदर्य आता अस्तित्वाच्या संकटात सापडले आहे. भौतिक विकासकामांच्या नावाखाली रस्ते, औद्योगिक वसाहती, ग्रामविकास यासाठी मोठ्या प्रमाणात मुरूम, दगड, गोटे, माती अशा गौण खनिजांचा वापर होत असून, त्यामुळे निसर्गाची साक्ष देणाऱ्या डोंगररांगांचे अवैधरित्या फोडकाम सुरू आहे. शासनाचे 'बोटचेपे' धोरण आणि महसूल व पोलिस प्रशासनातील काही अधिकाऱ्यांची



भू-माफियांशी हातमिळवणी यामुळे या अवैध कृत्यांना अधिकच चालना मिळाली आहे. बीड जिल्ह्यातील निसर्गरम्य बालाघाटाच्या डोंगररांगा महसूल आणि पोलिस प्रशासनाच्या संगनमताने चालणाऱ्या गौण खनिज माफियांच्या तावडीत सापडल्या आहेत.

सामाजिक कार्यकर्ते आणि पर्यावरणप्रेमी यांनी वारंवार तक्रारी करून आंदोलने केली असतानाही प्रशासन जाणीवपूर्वक कारवाई टाळत आहे. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीत महसूल व पोलिस विभागातील काही अधिकारी किंवा त्यांच्या निकटवर्तीयांच्या वाहनांचा सहभाग असल्याची चर्चा जनतेमध्ये खुलेआम होत आहे. या उत्खननामुळे जिल्ह्यातील जंगलं, झाडं, डोंगररांगा नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. भूजलपातळी झपाट्याने घटत आहे, मातीची धूप वाढली असून भविष्यात बीड जिल्हा ओसाड होण्याचा धोका निर्माण झाला आहे, अशी गंभीर चिंता पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे. यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी पर्यावरणमंत्री पंकजा ताई मुंडे यांना लेखी निवेदन देऊन बालाघाटाच्या डोंगररांगा वाचविण्याचे साकडे घातले आहे.

---

# बीड बसस्थानकाला उद्घाटना आधीच गळती

बीड

तब्बल १३ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेले बीडचे नवीन बसस्थानक उद्घाटनाआधीच गळतीला लागले असून, प्रवाशांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. दोन दिवसांपूर्वी झालेल्या पावसात स्थानकाच्या छपरातून अनेक ठिकाणी पाणी गळत होते, त्यामुळे प्रवाशांना छत्री घेऊन बसस्थानकात उभे राहावे लागले.

जून २०२५ मध्ये हे काम पूर्ण होणे अपेक्षित होते, मात्र अद्याप अनेक कामे अपूर्ण असून प्रवाशांना सतत गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. परिसरात स्वच्छतेचा पूर्ण अभाव आहे; शौचालय बांधले असले तरी ते पत्रे लावून बंद ठेवण्यात आले आहेत. तसेच बसस्थानक परिसरात पथदिवे बंद असुन योग्य प्रकाश व्यवस्था नसल्याने रात्री अनुचित घटना घडल्याचेप्रकार आढळून आले आहेत.

गुत्तेदाराने निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्यामुळे बसस्थानकाचे छप्पर आणि पत्रे उघड्यावर आले आहेत. संबंधित विभागीय नियंत्रक व अभियंत्यांनी याकडे लक्ष न दिल्याचे स्पष्ट होत असून, गुणनियंत्रक विभागामार्फत चौकशी करून दोषींवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे. त्यांनी यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना लेखी तक्रार सादर करून आंदोलनाचा इशारा दिला आहे.

---

# अवकाळी पावसाच्या पाण्यामध्ये शेतकऱ्यांची मेहनत वाहून गेली



टाकळी जिवरग८ तासांपूर्वी

सिल्लोड । प्रतिनिधी

तालुक्यात परतीच्या पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. टाकळी जिवरग व कायगाव परिसरात गेल्या दोन महिन्यांपासून सतत पाऊस सुरू आहे. या पावसामुळे कापसाच्या बोंडात ओल शिरली. त्यामुळे कापूस काळवंडला. अनेक ठिकाणी कापसाच्या वाती झाल्या, झाडे वाकली, ओलसर हवामानामुळे रोगराई वाढली, कापसाचे उत्पादन धोक्यात आले. सोयाबीनचे पीक पाण्याखाली गेले. काही शेतकऱ्यांनी काढून सुकवण्यासाठी गोळा केलेले पीक पावसात भिजले. ओलसर शेंगा फुटल्या. अंकुर फुटल्याने उत्पादन पूर्णपणे नष्ट झाले. कापसाच्या झाडांना बोंड कमी लागले असुन फुले गळाली आहेत. ओलाव्यामुळे कापसाची गुणवत्ता घसरली आहे. बाजारभावावरही याचा परिणाम होणार आहे. तालुक्यात अनेक भागांत पिके जमिनीतच कुजली. शेतकऱ्यांनी कर्ज काढून पेरणी केली. खत, औषधे घेतली, मजुरांचा खर्च केला, आता रब्बी हंगामासाठी साधनसामग्री आणि भांडवल उरलेले नाही. बी-बियाणे, सिंचनासाठी पैसे नाहीत. सध्या शेतातील कामे ठप्प आहेत. कापूस भिजल्यामुळे वजन वाढले. वेचणीसाठी मजुरी जास्त लागते. विक्रीसाठी कमी भाव मिळणार आहे. त्यामुळे दुहेरी आर्थिक फटका बसणार आहे. संततधार पावसाने कापसाच्या झाल्या वाती; शेतकरी संकटात शेतकऱ्यांना मदत हवी शेतकरी मधुकर फुके यांनी सांगितले, ''मी तीन एकरात कपाशी केली आहे. बोंड फुटले आहे. पण कापूस पूर्ण भिजला आहे. मजूर मिळत नाहीत. सध्या कापसाला पाच हजार ते साडेसहा हजार रुपये भाव आहे. तरीही नुकसान होत आहे.'' परतीच्या पावसाने शेतकऱ्यांची आशा, मेहनत आणि पुढील हंगामाची तयारी वाहून नेली आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदतीची गरज आहे.

---

# घरफोडी करणारा आरोपी अटक सहा लाखाचा मुददेमाल जप्त

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्हयामध्ये चोरी, घरफोडीचे गुन्हे उघड करुन आरोपीतांचा शोध घेवून कारवाई करणेबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. दिनांक ३१ ऑक्टोंबर रोजी फिर्यादी वाढेकर, रा.भगतसिंगनगर, नविन मोंडयाच्या पाठीमागे, जालना ता.जि. जालना यांनी दिनांक ३०/१०/२०२५ रोजी ते नाव्हा, जालना येथे भाजीपाला विक्रीकामी गेलेले असतांना त्यांचे राहते घरी अज्ञात चोरट्यांनी आर्थिक फायदयासाठी चॅनल गेटचे व घराचे लॉक तोडुन घरात प्रवेश करुन रु.७,००,०००/- किंमतीची रोख रक्कम चोरी केलेबाबत चंदनझिरा पोलीस ठाणे, जालना येथे गु.र.नं. ५७०/२०२५ कलम ३०५(), ३३१(३) भा. न्या. सं अन्वये गुन्हा दाखल केला होता.

दिनांक ०१/११/२०२५ रोजी अज्ञात आरोपीताचा शोध घेत असतांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, आरोपी आकाश लिखे, वय-२५ वर्ष, रा. भगतसिंग नगर, नवीन मोंढयाच्या पाठीमागे, जालना याने चोरी केली असल्याबाबत माहिती मिळाल्याने त्याचा शोध घेत असतांना तो बदनापुर येथे मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने विचारणा करता त्याने गुन्हा केल्याची कबुली देवुन गुन्हयातील चोरी केलेली रोख रक्कम रु.६,४०,०००/- व चोरीच्या पैशातून दि.०१/११/२०२५ रोजी रु.२२,५००/- किंमतीचा मोटो एज ६० फुजन मोबाईल, रु.५००/- किंमतीचे ब्लुटुथ हेडसेट, गुन्हा करतांना आरोपीने वापरलेला रु.१०००/- किंमतीचा आयटेल कंपनीचा बेसिक मोबाईल असा एकुण रु.६,६४,०००/- किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, यांच्यासह पथकाने कारवाई केली.

---

# ग्रामीण रुग्णालय पाटोदा येथे रुग्णांना फळ वाटप

पाटोदा दिनांक १ नोव्हेंबर रोजी नवगण शिक्षण संस्था राजुरी ( न ) चे सचिव मा. डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामीण रुग्णालयात पाटोदा येथील रुग्णांना वसंतदादा पाटील महाविद्यालय पाटोदा यांच्या वतीने फळ वाटप उपक्रम राबविण्यात आला

वसंत दादा पाटील महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रुग्णांना फळ वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. बळीराम राख, कार्यालयीन अधिक्षक श्री. अशोक पवार ,ग्रामीण रुग्णालय पाटोदा येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. अभिषेक जाधव, वैद्यकीय अधिकारी डॉ. शुभांगी ओमासे, डॉ. विशाल तांगडे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्री. बारीकराव राख, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सोमनाथ लांडगे यांच्या हस्ते रुग्णांना फळ वाटप करण्यात आले.

---

# तिसगावात रस्त्याच्या दुतर्फा बाजारामुळे वाहतूक कोंडी

## तासनतास वाहनांच्या रांगा, वाहनचालक हैराण, प्रशासनाचे दुर्लक्ष

पाथर्डी । प्रतिनिधी

ग्रामपंचायत, राष्ट्रीय महामार्ग विभाग व तालुका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे तालुक्यातील तिसगाव येथे राष्ट्रीय महामार्गावरच दोन्ही बाजूंनी बाजार भरू लागला आहे. त्यामुळे येथे सातत्याने वाहतूक कोंडी होत आहे. वाहनचालक तासनतास या कोंडीत अडकून पडतात. पोलिसांचे सुद्धा याकडे सोयीस्कर दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे ही समस्या दिवसेंदिवस अधिकच तीव्र होत आहे. वाहतूक कोंडी होत असल्याने अडचणीत आणखी भर पडली आहे.

पाथर्डी शहरानंतर सर्वात मोठा आठवडे बाजार तिसगाव येथे भरतो. परिसरातील सुमारे ३५ ते ४० गावांचे अर्थचक्र येथील बाजारावर अवलंबून आहे. दर गुरुवारी भरणाऱ्या बाजाराला पूर्वी बाजारतळावर जागा होती. आता बाजारकरुंची संख्या वाढली आहे. बाजारतळ सुद्धा गैरसोयीचे असल्याने तेथे विक्रेते फिरकत नाहीत. तिसगाव बसस्टँडवरून अहिल्यानगरकडे



जाणाऱ्या रस्त्यावर विक्रेते पथारी मांडून बसतात. माल विकत घेणारे आपल्या वाहनांसह फिरत असतात. त्यामुळे जड व अवजड वाहनांसह एसटी बसना जागा राहत नाही.

दिवसभरात मराठवाड्यासह शेवगाव पाथर्डी तालुक्यातून सुमारे चारशे बसेस या रस्त्यावरून पुण्या मुंबईकडे जातात. त्यातच एखादी दुचाकी आडवी असेल तर गाड्या पुढे जात नाहीत. एक दीड किलोमीटरपर्यंत रांगा लागतात. बसस्थानकावरूनच शेवगावकडे जाणारा रस्ता सुरू होतो. हा चौक पूर्णपणे कोंडीत सापडून वाहन चालकांना मनस्ताप होतो. सध्या शाळांच्या सुट्ट्या संपत आल्याने शहराकडे परतणाऱ्यांची धावपळ सुरू आहे. बाजार रस्त्यावर भरत असल्याने तासनतास जागेवरच थांबावे लागते. पूर्वी रस्त्याच्या एका बाजूने रस्ता मोकळा सोडून बसणारे विक्रेते आता दोन्ही बाजूंनी बसू लागले आहेत. या गोष्टीची माहिती ग्रामपंचायत प्रशासनालाही आहे. ग्रामपंचायतींचे कर्मचारी पदाधिकारी देखील येथूनच खरेदी करत असतात.

तरीही त्यांना तेथील अडचणी सोडवाव्यात याबद्दल फारशी जाणीव नसल्याचे दिसून येत आहे. कोंडी दूर करण्यासाठी पर्यायही उपलब्ध वास्तविक बाजार समितीच्या आवारामध्ये मोठी जागा आहे.

ग्रामपंचायतीकडून बाजार समितीला मानधन स्वरूपात उत्पन्न सुरू होईल. राष्ट्रीय महामार्ग खुला राहिल्यास वाहतूक कोंडी टळून वाहनचालकांना त्रास होणार नाही. गेल्या पंधरा-वीस वर्षांपासून अधूनमधून ही मागणी होते. परंतु याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही.

---

# कामठा फाटा शिवारात आढळला मृतदेह

## दोन दिवसांपूर्वी बेपत्ता झाल्याची तक्रार

हिंगोली। प्रतिनिधी

हदगाव तालुक्यातील मरडगा येथील बेपत्ता व्यक्तीचा मृतदेह रविवारी ता. २ सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास कामठाफाटा शिवारात आढळून आला आहे. आखाडा बाळापूर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाला असून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी आखाडा बाळापूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हदगाव तालुक्यातील मरडगा येथील राष्ट्रपाल हरिभाऊ खिल्लारे (४०) हे कुटुंबासह रोजमजूरी करून उदरनिर्वाह करतात. मागील तीन दिवसापुर्वी ते बाहेर जाऊन येतो असे सांगून घरातून बाहेर पडले होते. मात्र त्यानंतर ते घरी परतलेच नाही. त्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांना त्यांचा शोध सुरु केला होता. त्यांचा सर्व नातेवाईकांकडे शोध घेतला मात्र त्यांचा ठावठिकाणी लागला नाही. त्यामुळे दोन दिवसांपुर्वी त्यााांच्या कुटुबियांनी ते बेपत्ता झाल्याचा अर्ज आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात दिला होता. त्यावरून पोलिसांनी नोंद करून त्यांचा शोध सुरु केला होता. दरम्यान, आज सकाळी कामठा फाटा शिवारात उड्डाणपुलाच्या खाली एका व्यक्तीचा मृतदेह असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून आखाडा बाळापूर पोलिस ठाण्याचे निरीक्षक विष्णुकांत गुठ्ठे, सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बसवंते, जमादार राजेश घोंगडे, सागर वाढोणकर यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

पोलिसांनी मृतदेहाची अधिक तपासणी केली असता सदर मृतदेह राष्ट्रपाल यांचा असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी त्यांच्या कुटुंबियांना याबाबत माहिती देऊन मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी आखाडा बाळापूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केला आहे. या प्रकरणी आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात नोंद झाली नाही.

# जिल्हा परिषदेत ठोकळ्याचा भाव दहा हजार

## निवृत्त कर्मचाऱ्यांची ना हाक ना बोंब ; सीईओ गप्प, कॅफो कमिशनवर

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेमध्ये बारा हजारापेक्षा अधिक विविध विभागात कर्मचारी आहे या सर्व विभागाचे वेतन ,सेवेतील कर्मचारी, निवृत्ती कर्मचारी जिल्हा बाहेरून आलेले अतिरिक्त असलेले आणि वेतन वाढ ही सर्व कामे लेखा वित्त विभागामधून होतात मात्र अनेक कर्मचाऱ्यांना सेवापूर्ती नंतर देण्यात येणाऱ्या वेतनासाठी केलेल्या सेवेसाठी नोंद सही लागते त्या नोंद सहीसाठी या विभागाच्या रेकॉर्ड रूम मधील सहीला ठोकळा समजले जाते मात्र या ठोकळ्यासाठी प्रत्येकी पाच ते दहा हजार रुपये घेतले जात असल्याची चर्चा आहे.

जिल्हा परिषदेमधील शिक्षण विभाग, बांधकाम विभाग ,पंचायत विभाग ,महिला बालकल्याण विभाग ,पाणीपुरवठा विभाग, स्वच्छता विभाग ,आरोग्य विभाग असे अनेक विभाग सीईओ यांच्या अधिपत्याखाली असतात या कार्यालयामध्ये १२ हजारापेक्षा अधिक कर्मचारी नोंद आहे यातील काही कार्यरत तर काही सेवानिवृत्त आहेत परंतु लेखा आणि वित्त विभागामध्ये बांधकाम विभागाच्या आणि मंजुरीच्या फाईल बरोबरच जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागाच्या कामाच्या मंजुरी आणि बिलासाठी फाईल जातात त्या मंजुरीसाठी काय करावे लागते हे वेगळे सांगण्याची गरज नाही मात्र लेखा वित्त विभाग अंतर्गत जिल्हा परिषदेतील सर्व सेवानिवृत्त पदोन्नती आणि इतर कर्मचाऱ्यांना सेवा पुस्तके बरोबरच रेकॉर्ड रूम मधील पुरावा लागतो तो पुरावा म्हणजे ठोकळा, ठोकळा म्हणजे एक मोठा शिक्का आणि याच ठिकाणी एक मोठा कर्मचारी अनेक वर्षांपासून ठाण मांडून आहे तोही ठोकळ्या सारखाच आहेअसे बोलले जाते, परंतु शिक्का मारण्यासाठी प्रत्येकाकडून खिसा भरण्याची स्कीम सध्या जिल्हा परिषदेमध्ये सुरू असल्याची चर्चा आहे कोणीतरी गेल्या अनेक वर्षापासून याच विभागात ठाण मांडून बसलेला व्यक्ती, म्हणजे लेखा वित्त अधिकाऱ्यांनी बसवला असल्याची चर्चा आहे आणि ते ठोकळा मारल्या पूर्वी खिसा जाड करत असल्याची चर्चा आहे हाच कर्मचारी गेल्या अनेक वर्षापासून याच ठिकाणावर ठाण मांडून आहे अनेक वेळा कर्मचाऱ्यांच्या बदल्या होतात मात्र यांची बदली होत नाही याचे कारण ठोकळ्यातून मिळालेला दाम इतर वरिष्ठांना ते दान करत असल्याने मुळे बदली होत नसल्याचेही बोलले जात आहे.




### ठोकळ्याला किती दिवस सीईओ सांभाळणार!

लेखा वित्त विभागातील जिल्हा परिषदेच्या सर्व कर्मचाऱ्यांचे रेकॉर्ड संभाळणारे एक कर्मचारी गेल्या अनेक वर्षापासून त्याच ठिकाणी आहे अनेक वेळा कर्मचारी ताटकळत बसतात मात्र ते कुलूप लावून बाहेर जातात हेच ते ठोकळ्यावाले महाशय यांना जिल्हा परिषदेचे सीईओ आणि लेखा वित्त अधिकारी किती दिवस सांभाळणार आहेत हा प्रश्न आहे जर त्यांच्या ठोकळ्याची रक्कम वरपर्यंत जात असेल तर त्यांच्या बदलीसाठी न्याय कोणाकडे मागायचा हा प्रश्न आहे

# पटेल मित्र परिवारातर्फे भव्य रक्तदान शिबिर उत्साहात

बीड । प्रतिनिधी

रक्ताची गरज असलेल्या गरजू रुग्णांना मदत करण्याच्या उदात्त हेतूने पटेल मित्र परिवाराच्या वतीने आज दिनांक २ नोव्हेंबर २०२५ भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. बीड शहरातील अलकबीर फंक्शन हॉलच्या पाठीमागे, मौलाना युनुस कॉलनी, इस्लामपुरा येथे आयोजित या शिबिराला रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

आयोजक साबेर पटेल यांच्या पुढाकाराने या शिबिराचे आयोजिन ठेवण्यात आले होती. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे, या भावनेतून



परिसरातील अनेक तरुणांनी तसेच नागरिकांनी शिबिरात सहभाग नोंदवून रक्तदान केले. या सामाजिक उपक्रमाचे महत्त्व ओळखून, दैनिक सिटीझनचे संपादकशेख मुजीब भाईयांनी शिबिराला विशेष भेट देऊन आयोजकांना प्रोत्साहन दिले. त्यांच्यासोबत शहर प्रतिनिधी शेख फहीम, अँड सय्यद खाजा, जुबेर पटेल, पापू पटेल, शकील पटेल,

पान ३ वर

# चौसाळा सर्कलमध्ये भावी उमेदवारांचा गोतावळा

### अनेकांची बाशिंग बांधून तयारी

चौसाळा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा जिल्हा परिषद गटातील चौसाळा व बोरखेड पंचायत समिती व चौसाळा जिल्हा परिषद या गाण आहेत .यापुर्वी झालेल्या निवडणुकीत जिल्हा परिषद सदस्य पदावर भाजप वतीने अशोक लोढा यांनी निवडणूक लढवून आले तर चौसाळा पंचायत समितीमध्ये सौ स्वाती वायसे तर बोरखेड पंचायत समिती मधून सौ नीता झोडगे यांनी निवडणूक लढवून निवडून आल्या .

येत्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत अनेक कार्यकर्ते हे निवडणूक लढविण्याची घोषणा करीत असून काही नागरिकांनी आपली उमेदवारी ही जाहीर केली आहे या निवडणुकीत सर्वश्री माजी जिल्हा परिषद सदस्य अशोक लोढा यांच्यासह चौसाळाचे उपसरपंच अंकुशराव कळाशे डॉ. बाबुराव जोगदंड सतीश जोगदंड डॉ दिलीप मोटे प्रा श्री दत्तात्रेय पंजाबराव शिंदे अँड चंद्रकांत गोरे बापू पवार भूषण झोडगे अंकुशराव गोरे सुधाकर गुंजाळ राहुल जोगदंड हे संभावित उमेदवार असल्याचे नागरिकांतून कळते तर या उमेदवारांच्या व्यतिरिक्त अनेकही पडद्याआडून उमेदवारीच्या रिंगणात उतरण्याचे तयारीत असल्याचे कळते.

# प्रा.अजय जोशी यांनी शेतकऱ्यांच्या अडचणींचा जिल्हाधिकारी यांच्यासमोर मांडला पाढा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टी नुकसान भरपाई मिळण्यात येणाऱ्या अडचणींचा मुद्दा जिल्हाधिकारी बीड यांच्यासमोर पाटोदा तहसील कार्यालयात बीड जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांच्या मार्गदर्शनाखाली आढावा बैठक दि.३१ गुरुवार रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास आयोजित करण्यात आले असता मराठी पत्रकार परिषदेचे तालुका अध्यक्ष प्रा अजय जोशी, सचिव हमीद पठाण, उपध्यक्ष जावेद शेख यांनी शेतकऱ्यांना सर्वर बंद केवायसीच्या अडचणी मुळे त्यांच्या हक्कासाठी जिल्हाधिकारी साहेबांशी सविस्तर



चर्चा करून अडचणी तात्काळ दुर करुन त्यांना नुकसान भरपाई भेटावी या नुकसानग्रस्त शेतकर्यांना तात्काळ भरपाईवाटप करण्याची मागणी केली. अनेक शेतकऱ्यांना ऑनलाइन तांत्रिक अडचणी, खाते क्रमांक विसंगती आणि पंचनाम्यांतील त्रुटींमुळे भरपाई थांबलेली असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. जिल्हाधिकारी साहेबांनी तत्काळ कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या असून शेतकऱ्यांना योग्य व वेळेत मदत मिळेल, असे आश्वासन दिले.

# सीना नदीवरील खडकत-१ बंधाऱ्याचे पुनर्निर्माण पूर्ण

## नाम फाउंडेशन व आ.सुरेश धस यांच्या पुढाकाराने जलसाठ्याला नवा श्वास!

आष्टी । प्रतिनिधी

अतिवृष्टीच्या तडाख्यात सीना नदीने कहर केला आणि नदीपात्रातील पाच बंधारे वाहून गेले. त्यात खडकत-१ व सांगवी संगमेश्वर (ता. आष्टी, जि. बीड) येथील बंधाऱ्यांचे मोठे नुकसान झाले. या बंधाऱ्यांवर अवलंबून असलेली सुमारे ८ ते १० हजार हेक्टर बागायती शेती पाण्याअभावी धोक्यात आली होती.

महापुरानंतरची स्थिती पाहण्यासाठी राज्याचे महसूल मंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रत्यक्ष स्थळाची पाहणी केली. यावेळी आ. सुरेश धस यांनी सांगितले की जर हे बंधारे तातडीने दुरुस्त केले नाहीत तर आष्टी तालुका पुन्हा दुष्काळग्रस्त होईल.



या गंभीर परिस्थितीची जाणीव होताच आमदार धस यांनी नाम फाउंडेशनशी संपर्क साधून मदतीचे आवाहन केले. तत्परतेने प्रतिसाद देत फाउंडेशनने २० ऑक्टोबर रोजी कामास प्रारंभ केला.केवळ १० ते १५ दिवसांच्या कालावधीत, नाम फाउंडेशन, महाराष्ट्र शासन आणि गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास

पान ३ वर

# जुगार अड्ड्यावर युसूफवडगांव पोलिसांची धाड; ५ जणांना अटक तर पावणे तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव पोलिस स्टेशनच्या हद्दीतील बनसारोळा येथील महेंद्र गायकवाड यांच्या शेतात बेकायदेशीर पद्धतीने जुगार अड्डा चालु होता.याबाबत पोलिसांना माहिती मिळताच १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता या जुगार अड्ड्यावर धाड टाकत ५ जणांना अटक करत त्यांच्याकडुन पावणे तीन लाखाचा मुद्दे माला देखील जप्त केला.

बनसारोळा येथील महेंद्र गायकवाड यांच्या शेतात बेकायदेशीर पद्धतीने जुगार अड्डा चालु असल्याची गुप्त माहीती मिळताच प्रभारी सहाय्यक पोलीस निरिक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने तिर्रट नावाचा जुगार खेळणाऱ्या सात जणांना पाहिले.त्यातील दोघांनी पोलिस येत असल्याचे पाहताच तेथुन पळ काढला मात्र विष्णु शंकर दळवी,बालाजी भारत कावळे,अतिनंद रामा कांबळे,गणेश दिगंबर फसले व महादेव भागवत राऊत या पाच जणांना मात्र पोलिसांनी ताब्यात घेतले व त्यांच्याकडुन पोलिसांनी रोख ५ हजार २०० रुपये व जुगाराच्या साहित्यासह ५ मोटारसायकली असा एकुण २ लाख ४८ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. पोलिस हवालदार धनंजय कारले यांच्या फिर्यादीवरून सातही आरोपी विरूद्ध महाराष्ट्र जुगार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास सहा.पो.उपनिरीक्षक मोरे हे करत आहेत.



# अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्याने बंडू पटाईत या शेतकऱ्याची आत्महत्या

गेवराई । प्रतिनिधी

यावर्षी संपूर्ण गेवराई तालुक्यात अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांच्या पिकाचे अतोनात नुकसान झाले आहे. हातचे पीक गेल्याने बँकेचे कर्ज भरायचे कसे? हा प्रश्न शेतकऱ्यासमोर उभा राहिला आहे. यातच सिरसदेवी येथील हातबल झालेल्या तरुण शेतकरी बंडू पटाईत यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याने पंचक्रोशीत हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, गेवराई तालुक्यात अतिवृष्टी झाल्याने आणि त्यातच गोदावरी नदीपात्र आणि सिंदफना नदी पात्रात मोठ्या प्रमाणावर पाणी आल्याने शेतकऱ्यांच्या पिकाचे आतोनात नुकसान झाले आहे. उभे पीक आणि पशुधन गेल्याने शेतकरी हातबल झाले आहेत. हातचे पीक गेल्याने बँकेकडून घेतलेले कर्ज भरायचे कसे ? आणि घर चालवायचे कसे ? हा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याने शेतकऱ्यांची मनस्थिती ढासळली आहे. याच परिस्थितीत सिरसदेवी येथील हातबल झालेल्या तरुण शेतकरी बंडू पाटाईत यांनी दिनांक १ नोव्हेंबर २०२५ रोजी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या आत्महत्येमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. दिनांक २ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता सिरसदेवी येथील स्मशानभूमीवर स्व बंडू पटाईत यांच्यावर दुःखद वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, माजी आमदार सुनील धांडे, माजी जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. बंडू पटाईत हे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि माजी सभापती युधाजित पंडित यांचे अत्यंत कट्टर समर्थक होते.

# धुमेगाव शिवारात दीड कोटीचा गांजा जप्त

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चकलांबा हद्दीतील धुमेगाव येथील पिराचे शेतामध्ये अंमली पदार्थ गांजाचे शेती करणाऱ्या आरोपींना स्था.गु.शा. बीड पथकाने छापा टाकुन ४९० किलो गांजा कि. अं. १,३७,३९,६००/- रु चा मुद्देमाल जप्त करुन एका आरोपीस केले जेरबंद

नवनीत काँवत , पोलीस अधीक्षक, बीड यांनी जिल्हयातील सर्वच प्रकारचे अवैध धंद्यावर कारवाई करण्यासाठी पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, स्था.गु.शा. बीड यांना आदेश



### स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

दिलेले आहे. त्याअनुषंगाने दिनांक ०१/११/२०२५ रोजी पोनि शिवाजी बंटेवाड यांना गोपनिय माहिती मिळाली की, धुमेगाव शिवारातील शेत नामे पिराचे शेत मध्ये नारायण मगर याने त्याचे आर्थीक फायद्यासाठी बेकादेशीररित्या अंमली पदार्थ गांजाच्या झाडाची लागवड करुन संवर्धन व जोपासना करीत आहे. अशी खात्रीशिर बातमी मिळाल्यावरुन सदरची माहिती पोलीस अधीक्षक, बीड व उपविभागीय पोलीस अधिकारी गेवराई यांना कळवुन त्यांनी कारवाई करण्याचे आदेश दिल्याने पो.नि. शिवाजी बंटेवाड व प्रभारी अधिकारी पो.स्टे. चकलांबा यांचे संयुक्त पथक धुमेगाव शिवारातील पिराचे शेताजवळ गांजाची लागवड केलेल्या नारायण मगर यांचे शेतामध्ये छापा टाकला असता कापसाच्या पिकाच्या शेतामध्ये अंतरावर गांजाच्या झाडाची लागवड केल्याचे दिसुन आले तेव्हा शेत मालक नारायण शेषेराव मगर वय ४४ वर्षे व्य. शेती, रा. धुमेगाव ता. गेवराई, जि.बीड यांना विचारपुस केली असता त्याने सदर गांजाचे झाडे लागवड केल्याचे सांगितले आहे. तसेच सदर शेताचे शेजारी असलेल्या परिसराची पाहणी केली असता तेथे आरोपी सुरेश सर्जेराव मगर याचे शेतात देखील गांजाची झाडे मिळुन आली. त्यावरुन सदर दोन्ही शेतातील सर्व गांजाचे झांडाचा सविस्तर पंचनामा करुन आरोपी नामे नारायण शेषेराव मगर याचे गट क्र. १९० मध्ये ४४ गांजाची झाडे वजन १५३.१५ ग्राम कि.अं.४२,८८,२००/- व आरोपी नामे सुरेश सर्जेराव मगर याचे मालकीचे शेतामध्ये १३१ गांजाची झाडे वजन ३३७.५५ ग्राम कि.अं. ९४,५१,४००/- असा एकुण

पान ३ वर

# केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत ७ नोव्हेंबर रोजी भव्य शेतकरी संवाद मेळावा!

## कृषीकुल येथे जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली प्रशासकीय आढावा बैठक

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या प्रमुख उपस्थितीत सिरसाळा येथे भव्य शेतकरी संवाद मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याच्या अनुषंगाने सुरू असलेल्या तयारीचा रविवार, दिनांक ०२ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आढावा घेतला. कृषीकुल येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीस विविध शासकीय कार्यालयांचे कार्यालयीन प्रमुख उपस्थित होते. शेतकरी संवाद मेळाव्यास मराठवाड्यातील हजारो शेतकरी उपस्थित राहणार आहेत. याच ठिकाणी कृषी प्रदर्शिनी भरवण्यात येणार आहे. युद्ध पातळीवर मंडप उभारणी, हेलिकॉप्टर उतरवण्यासाठी हेलिपॅड तयार करण्यात येत असून, सुरू असलेल्या तयारीचा जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घेतला. सर्व प्रशासकीय विभागांना त्यांनी आवश्यक असलेल्या महत्त्वपूर्ण सूचनाही केल्या. या आढावा बैठकीस ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांच्यासह सर्व प्रमुख संयोजकांची उपस्थिती होती.

### अभूतपूर्व शेतकरी संवाद मेळावा

मराठवाडा हा सर्वाधिक दुष्काळी प्रदेश म्हणून गणल्या जातो. कधी कोरडा तर कधी ओला दुष्काळा सतत पडल्याने शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती कमालीची ढासळली आहे. आर्थिक संकटात आणि कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या कित्येक शेतकऱ्यांनी आत्महत्येचे मार्ग पत्करले. ही परिस्थिती कुठेतरी बदलली पाहिजे, त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली पाहिजे, त्यांच्यातील हरवलेला आत्मविश्वास पुन्हा नव्याने जागवला पाहिजे हा या शेतकरी संवाद मेळाव्याचा प्रमुख उद्देश असून, शेतकऱ्यांच्या हिताच्या अनेक योजना ग्लोबल विकास ट्रस्टकडून तयार करण्यात आल्या असून त्यांचीही घोषणा याच कार्यक्रमात होणार आहे. त्यामुळे हा अभूतपूर्व व भुतो न भविष्यती असा शेतकरी संवाद मेळावा होणार आहे. या मेळाव्यास हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.



ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांची प्रेरणा आणि संकल्पनेतून दिनांक ०७ नोव्हेंबर रोजी सिरसाळा येथे भव्य शेतकरी संवाद मेळावा संपन्न होत आहे. या कार्यक्रमास देशाचे कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यासह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, पशुसंवर्धन तथा दुग्धविकास मंत्री पंकजाताई मुंडे, खा.बजरंग सोनवणे, खा.रजनीताई

पान ३ वर

# प्रेम चांदणे यांच्याकडून गरजूंना मदत

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित दादा पवार गट ) विधानसभा अध्यक्ष उच्च शिक्षित दूरदृष्टी नेतृत्व. डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांचे खंदे समर्थक एकनिष्ठ प्रेमचंद रमेश चांदणे यांच्या मार्फत आज वाढदिवसाचे औचित्य साधुन शहरातील शहेंशाहवली दर्गा येथे जाऊन चादर चढवून दुवां मागितली तसेच बीड शहरातील श्रध्दास्थान श्री शनी महाराज मंदिरं येथे मनोभावी दर्शन घेऊन तेथील गरिब गरजुंना येणार्या थंडीपासून बचाव करण्यासाठी ब्लँकेटचे वाटप करुन परत भाजी मंडई येथील बेघर बेसहारा लोकासाठी असलेल्या



जिव्हाळा येथे जाऊन तिथे गोरगरिबांना गरजुंना ब्लँकेटचे वाटप करुन अतिशय चांगला उपक्रम राबवला यावेळी. सौ.संगिताताई वाघमारे. गौतम दादा धन्वे. बंडु भाऊ निसरगंध. कल्याण भाऊ ताकतोडे. कल्याण भाऊ डोंगरे. नितीन आव्हाड. बबन भाऊ चांदणे आदी

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

सोमवार दि.३ नोव्हेंबर २०२५ । पान ७

# आंदेकर-कोमकर टोळीयुद्धातून गणेश काळेचा बळी; गँगस्टर बंडू आंदेकर अन् कृष्णा आंदेकर यांच्यासह नऊ जणांवर गुन्हा दाखल

**पुणे प्रतिनिधी**

पुण्यातील कोंढवा परिसरातील गणेश काळे या रिक्षा चालकाच्या हत्या प्रकरणात पोलिसांनी चार आरोपींना अटक केली आहे. आंदेकर-कोमकर टोळीयुद्धातून गणेश काळेची हत्या झाली असल्याची माहिती आहे. हत्या केल्यानंतर चारही आरोपी पळून गेले होते. या चारपैकी एक आरोपी हा कृष्णा आंदेकरचा निकटवर्तीय असल्याची माहिती समोर आहे. कोंढवा गणेश काळे हत्या प्रकरणात आता गँगस्टर बंडू आंदेकर आणि कृष्णा आंदेकर यांच्यासह नऊ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



कोंढवा पोलीस स्टेशनमध्ये बंडू आंदेकर आणि कृष्णा आंदेकर यांच्यासह नऊ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. टोळी युद्धातूनच गणेश काळे याची हत्या झाल्याची माहिती समोर आली आहे. गुन्ह्यातील आरोपी बंडू आंदेकर, कृष्णा आंदेकर, आमिर खान, मयूर वाघमारे, स्वराज वाडेकर, अमन शेख, अरबाज पटेल इतर दोन अल्पवयीन आरोपींची गुन्ह्यात नावे आहेत. आज या हत्या प्रकरणातील आरोपींना दुपारी कोंढवा पोलीस कोर्टात हजर करणार आहेत.

शनिवारी, दुपारच्या वेळी वर्दळ असलेल्या ठिकाणी एका ३२ वर्षीय तरुणाची हत्या करण्यात आली. या घटनेने पुणे शहर टोळीयुध्दाने पुन्हा हादरले. पुण्यातील खडी मशीन चौकातून सासवडकडे जाणाऱ्या बोपदेव घाटातील रस्त्यावर असलेल्या एका पेट्रोलपंपावरसमोरच हत्या करण्यात आली. गणेश काळे असे हत्या करण्यात आलेल्या तरूणाचे नाव आहे. तो रिक्षा चालक होता. गणेश काळे हा वनराज आंदेकर हत्या प्रकरणातील आरोपी समीर काळे याचा सख्खा भाऊ आहे. वनराज आंदेकरच्या हत्येसाठी शस्त्र पुरवल्याचा आरोप समीर काळे याच्यावर आहे. पोलीस उपायुक्त राजकुमार शिंदे यांनी याप्रकरणी सांगितले की, दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास गणेश काळे हा रिक्षा घेऊन खडी मशीन चौकाच्या दिशेने निघाला होता. त्याचवेळी दोन दुचाकीवरून काही जण त्याचा पाठलाग करत आले. चौघांनी जवळून गणेश काळेवर गोळ्या झाडल्या. चार राऊंड फायर करण्यात आले.

गणेश काळे जखमी झाल्यानंतर त्यानंतर त्याच्या डोक्यात कोयत्याने दोन वार करण्यात आले. यात कोयत्याच्या हल्ल्याने त्याच्या डोक्यात आणि चेहऱ्यावर गंभीर जखमा झाल्या. गणेश हा येवलेवाडीत राहत होता. तो खडीमशीन चौकाकडे येत होता. पेट्रोलपंपाजवळ गणेशची रिक्षा अडवली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे त्याला काहीच करता आलं नाही. त्याला सावरण्याची संधी मिळण्यापूर्वीच दोघांनी त्याच्यावर गोळीबार सुरु केला. गणेश काळेला चार गोळ्या लागल्या. मानेत, छातीत व पोटात गोळ्या घुसल्या. त्यावंतर तो तो जागेवरच रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. तो खाली कोसळल्यानंतर दोन हल्लेखोरांनी त्याच्या डोक्यात कोयत्याने वार केले. ही हत्या गँगवारमधून करण्यात आल्याचं बोललं जात आहे. ज्या पद्धतीने माजी नगरसेवक वनराज आंदेकर याची हत्या करण्यात आली होती, तो पॅटर्न गणेश काळेच्या हत्येसाठी वापरण्यात आला आहे. वनराज आंदेकरवर आधी गोळ्या झाडण्यात आल्या होत्या, त्यानंतर कोयत्याने वार केले गेले होते. सप्टेंबर महिन्यात पुण्यातील नाना पेठमध्ये वनराजच्या भाच्याची आयुष कोमकरची हत्या करण्यात आली होती. माजी नगरसेवक वनराज आंदेकरच्या हत्येचा बदला म्हणून ही हत्या करण्यात आली होती, असे म्हटले जाते. आता गणेश काळेच्या हत्येने आंदेकर आणि कोमकर टोळी युद्धाची पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.

## पोलीस आयुक्तालयातच उघड झाले 'बनावट आयपीएस'चे पितळ

***पुणे । प्रतिनिधी***

स्वतःला आयपीएस अधिकारी असल्याचे सांगत थेट पुणे पोलीस आयुक्तालयात पोहोचलेल्या एका तरुणाचे पितळ शेवटी उघड झाले आहे. सागर वाघमोडे असे या बनावट अधिकाऱ्याचे नाव असून, त्याच्याविरुद्ध बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, मूळचा सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील रहिवासी असलेला सागर वाघमोडे हा स्वतःला आयपीएस अधिकारी असल्याचे भासवून विविध ठिकाणी फिरत होता. शनिवारी सायंकाळच्या सुमारास तो पुणे पोलीस आयुक्तालयात आला आणि एका वरिष्ठ पोलीस उपायुक्तांना भेटला. संवादादरम्यान त्याने माझा मित्रही आयपीएस अधिकारी आहे असे सांगून एका अधिकाऱ्याचे नाव घेतले. योगायोगाने त्या नावाचा खरा आयपीएस अधिकारी त्याच वेळी समोर आल्यानंतर वाघमोडेचा भांडाफोड झाला.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तत्काळ बंडगार्डन पोलिसांना बोलावून वाघमोडेला ताब्यात दिले. त्याची कसून चौकशी सुरू असून, तो आयुक्तालयात नेमका कोणत्या उद्देशाने आला होता, कुणाला भेटला आणि स्वतःला आयपीएस म्हणवण्यामागे त्याचा हेतू काय होता, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## 'सक्षमा' प्रकल्पांतर्गत आयोजित महिला बचत गटांच्या प्रदर्शनातून तब्बल तीन लाखांची उलाढाल

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

महापालिका आणि टाटा स्ट्राईव्ह यांच्या संयुक्त विद्यमाने भरवलेल्या १७ ठिकाणच्या प्रदर्शनांना नागरिकांचा उत्साही प्रतिसाद



पिंपरी, दि. ०२ नोव्हेंबर २०२५: पिंपरी चिंचवड महापालिका आणि टाटा स्ट्राईव्ह यांच्या संयुक्त विद्यमाने सक्षमा प्रकल्पांतर्गत दिवाळी काळात फराळ व विविध वस्तूंच्या विक्रीसाठी पिंपरी चिंचवड शहरातील वेगवेगळ्या १७ ठिकाणी प्रदर्शने भरवण्यात आली होती. या प्रदर्शनांमध्ये शहरातील १०० हून अधिक महिला स्वयं-सहाय्यता बचत गटांनी सहभाग घेतला. या उपक्रमातून जवळपास ३ लाखांची उलाढाल झाली आहे, अशी माहिती महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत देण्यात आली आहे.

या प्रदर्शनांच्या माध्यमातून स्थानिक महिलांना त्यांच्या बनवलेल्या दिवाळी फराळ व उत्पादनांच्या विक्री, ब्रँडिंग व प्रसिद्धीसाठी व्यासपीठ मिळाले. त्याचबरोबर सहभागी महिलांना व्यावसायिक संधीही उपलब्ध झाल्या. या वेळी उत्पादनांच्या विक्रीची मांडणी व व्यवस्था सक्षम फील्ड टीम व फेडरेशन सदस्यांनी एकत्रितपणे केली. या प्रदर्शनांना स्थानिक ग्राहकांचा उत्साही प्रतिसाद मिळाला. अनेक ग्राहकांनी या महिला-निर्मित वस्तू खरेदी केल्या व त्यातील दर्जा, पॅकिंग व सादरीकरणाबद्दल कौतुक केले. तसेच यावेळी महिला स्वयं-सहाय्यता समूहांनी सोशल मीडिया, ई-कॉमर्स अशा डिजिटल माध्यमांचा वापर करून आपला व्यवसाय विस्तारण्याचा मानस व्यक्त केला आहे.बचत गटांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या अशा उपक्रमांमुळे सामाजिक व आर्थिकदृष्ट्या महिलांचे सशक्तीकरण होण्यास मदत होते. या उपक्रमाने महिलांना एक नवीन व्यावसायिक दिशा मिळाली असून त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. आगामी काळात या स्वयं-सहाय्यता गटांना आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे स्वावलंबी बनवण्यासाठी महापालिकेच्या समाज विकास विभागाकडून विविध उपक्रम राबवण्याचे नियोजन आहे.

– ममता शिंदे, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

## पुण्यातील क्रीडा संस्कृतीला मिळणार बळकटी – अंजली भागवत

**पुणे । प्रतिनिधी**

'पुण्यात अनेक गुणवान खेळाडू आहेत. खासदार क्रीडा महोत्सवाच्या निमित्ताने सर्व खेळाडूंना आपले कौशल्य दाखवायला व्यासपीठ मिळणार आहे. यातून पुण्यातील क्रीडा संस्कृतीला बळकटी मिळणार आहे. या स्पर्धेतून काही खेळाडू पुढे देशाचे नेतृत्व करू शकतात,' असे प्रतिपादन खेल रत्न पुरस्कार प्राप्त ऑलिंपियन नेमबाज अंजली भागवत यांनी केले.




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'फिट युवा फॉर विकसित भारत' या आवाहनाला प्रतिसाद देऊन केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकारातून पहिला 'खासदार क्रीडा महोत्सवा'ला आज, रविवारपासून सुरुवात झाली. या महोत्सवाची सुरुवात मॅरेथॉनने झाली. स. प. महाविद्यालयाच्या मैदानात रविवारी झालेल्या पारितोषिक समारंभावेळी खासदार क्रीडा महोत्सवासाठीची ज्योत प्रज्वलन कार्यक्रम पार पडला. यावेळी अंजली भागवत यांनी महोत्सवाचे अधिकृत उद्घाटन झाल्याचे जाहीर केले. ही ज्योत प्रज्वलीत करण्यासाठी ऑलिंपियन, आशियाई पदक विजेते आणि सर्वच खेळातील माजी खेळाडू, प्रशिक्षकांना आमंत्रित करण्यात आले होते. या वेळी व्यासपीठावर श्रीरंग इनामदार, रमेश विपट, सुरेखा द्रविड, गौरव नाटेकर, संदीप कीर्तने, केदार जाधव, रेखा भिडे, मनोज पिंगळे, शांताराम जाधव, मनोर एरंडे, शकुंतला खटावकर, आकांक्षा हगवणे, कौस्तुभ राडकर असे आजी-माजी खेळाडू उपस्थित होते. खासदार मोहोळ यांनी आकाक्षात फुगे सोडून या स्पर्धेची सुरुवात केली. मुरलीधर मोहोळ म्हणाले, 'तरुण तंदुरुस्त राहिला, तर देश तंदुरुस्त राहील. त्यासाठीच या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. माझ्या पुण्याने देशाला अनेक खेळाडू दिले आहेत. या स्पर्धेच्या निमित्ताने पुण्यातील क्रीडा संस्कृतीचा प्रचार-प्रसार करायचा आहे.' मोहोळ यांनी या वेळी मागे राहून हे व्यासपीठ खेळाडूंचे असल्याचे सांगून सर्व माजी खेळाडूंना पुढाकार घेण्यास सांगितले. खासदार क्रीडा महोत्सव १६ नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे. शहरातील विविध मैदानांवर एकूण ३५ प्रकारांच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा विविध खेळांच्या असोसिएशनच्या मदतीने आयोजित करण्यात येणार आहेत. या क्रीडा महोत्सवात खेळाडूंसोबतच ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि सर्वसामान्य नागरिकांनाही आपले कौशल्य सादर करण्याची संधी मिळणार आहे. भारतीय पारंपरिक खेळांसह आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक स्पर्धांचा यात समावेश आहे. या स्पर्धा सणस मैदान, टिळक तलाव मैदान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, म्हाळुंगे-बालेवाडी क्रीडा संकुल, स. प. महाविद्यालय, महाराष्ट्र मंडळ, डेक्कन जिमखाना, खराडी आदी ठिकाणी होणार आहेत.

## महापालिका आयुक्त यांची देवाची उरुळी कचरा डेपो परिसराला भेट

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी (दि. ०२) देवाची उरुळी कचरा डेपो परिसरास भेट देऊन तेथील कामकाजाची सविस्तर पाहणी केली. या भेटीदरम्यान त्यांनी पुणे मनपाच्या बायोमायनिंग प्रकल्प तसेच ५०० मेट्रिक टन क्षमतेच्या मिश्र कचरा प्रक्रिया प्रकल्पाची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून कामकाजाचा आढावा घेतला.



यावेळी महापालिका आयुक्त यांनी हडपसर आणि घोले रोड येथील कचरा हस्तांतरण केंद्र यांचे आधुनिकीकरण करणे, घरोघरी जाऊन वाहनांद्वारे कचरा गोळा करणे कामी आधुनिक यंत्रणा निर्माण करणे, स्मार्ट कलेक्शन केंद्र निर्माण करणे, वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाचे कामकाज गतीने पूर्ण करणे याबाबत आदेश दिले. निरीक्षणादरम्यान आयुक्त नवल किशोर राम यांनी पुणे शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक कार्यक्षम व शाश्वत करण्यासाठी अजून नवे कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याची आवश्यकता असल्याचे नमूद केले. त्यांनी पुढील काळात महानगरपालिकेची कचरा प्रक्रिया क्षमता वाढविण्यावर विशेष भर देण्याचे निर्देश दिले.यावेळी मा. आयुक्त यांनी लिगसी वेस्ट (जुना कचरा) यावर शास्त्रोक्त बायोमायनिंग / बायो-रिमेडियेशन प्रक्रिया एक वर्षाच्या आत पूर्ण करून संबंधित जागा रिकामी करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. त्यांनी नमूद केले की, रिकामी करण्यात आलेली जागा लोकोपयोगी प्रकल्प अथवा विकास योजनांसाठी वापरणे शक्य होईल. या पाहणीदरम्यान घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख संदिप कदम, कार्यकारी अभियंता प्रसाद जगताप व अमर मदिकुंट, संबंधित अधिकारी व कंत्राटदार प्रतिनिधी उपस्थित होते. पुणे महानगरपालिका पर्यावरणीय दृष्टीने शाश्वत कचरा व्यवस्थापनासाठी कटिबद्ध असून, येणाऱ्या काळात नागरिकांच्या सहकार्याने स्वच्छ आणि हरित पुण्याच्या दिशेने पुढील पाऊले उचलली जातील, असेही यावेळी सांगण्यात आले.

## थोरांदळे परिसरात दुचाकीवरून घरी चाललेल्या तरुणावर बिबट्याचा हल्ला



**पुणे । प्रतिनिधी**

दुचाकीवरून घरी चाललेल्या अमोल अरुण गुंजाळ या तरुणावर बिबट्याने हल्ला करून जखमी केल्याची घटना शनिवार रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास थोरांदळे जवळ घडली. थोरांदळे येथील वेस्टर्न कंपनीच्या आसपास बिबट या वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात अमोल गुंजाळ हा तरुण जखमी झाला आहे. आठ वाजता घरी जात असताना बिबट्याने हल्ला केल्याने गाडी घसरली,यात बिबट्याचे दात लागले असून घसरल्याने हात,पाय जखमा झाल्या आहेत. वनविभागाला माहिती मिळताच वनरक्षक बी एच पोत्रे, वनसेवक महेश टेमगीरे यांनी जखमी झालेल्या अमोल गुंजाळ यांस मंचर उपजिल्हा ग्रामीण रुग्णालयात दाखल करून उपचार करण्यात आले. लस दिल्यानंतर जखमी अमोल गुंजाळ यांस घरी सुखरूप सोडण्यात आले.

## घराबाहेर खेळणाऱ्या १३ वर्षीय मुलावर बिबट्याने घातली झडप: संतप्त जमावाने वनविभागाचे वाहन पेटवले

**पिंपरखेड । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील पिंपरखेड येथे रविवारी (दि. २) दुपारी पावणे चार सुमारास बिबट्याने रोहन विलास बोंबे या १३ वर्षांच्या मुलांवर हल्ला करत ऊसाच्या शेतात ओढून नेले. या हल्ल्यात मुलगा गंभीर जखमी झाल्याने रोहन याचा जागेवरच दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने पिंपरखेड परिसर पुन्हा हादरला आहे.





पिंपरखेड येथे दुपारी पावणे चार वाजेच्या सुमारास रोहन बोंबे (वय १३) हा घराबाहेर मोकळ्या शेतात खेळत होता. यावेळी हत्ती गवतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्याच्यावर झडप घालून ऊसाच्या शेतात ओढत नेले. या परिसरात बिबट्याची भिती असल्याने मुलगा दिसत नसल्याचे त्यांच्या आजीने आई-वडिलांना सांगितले. त्यांनी तत्काळ शेजारील लोकांना बोलावून शोध घेतला. तरूणांनी जोराचा आरडाओरड करत जवळच्या ऊसाच्या शेतात शोध सुरू केला. यावेळी त्यांना रोहन मृतावस्थेत मिळाला. अतिशय हृदयद्रावक घडलेल्या या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेत वनविभागाची गाडी उलटी करत नंतर वाहन पेटवून दिले. २० दिवसांत तिसरी घटना घडली असून या घटनेने पिंपरखेड परिसरातील ग्रामस्थ आक्रमक पवित्र्यात दिसून येत आहे. दोन घटना घडूनही वनविभागाकडून बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी ठोस उपाययोजना केली नसल्याने ग्रामस्थांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. रोहनच्या मृत्युच्या घटनेने पिंपरखेड ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला असून ठोस निर्णय झाल्याशिवाय मुलाचे शवविच्छेदन करू न देण्याचा निर्णय घेतला.दोन वेळा रास्तारोको आंदोलन करून संवेदना हीन वनविभाग व शासनाला जाग येत नसल्याने संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी वनविभागाचे वाहन पेटवून तीव्र संताप व्यक्त केला.

## पुण्यातील कोरेगाव पार्क परिसरात भीषण अपघात; दोघा भावांचा भयानक अंत

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील कोरेगाव पार्क (घेंशसरेप झरीज्ञ रललळवशर्पीं) परिसरात पुन्हा भीषण अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. पहाटेच्या सुमारास बंडगार्डन मेट्रो स्टेशन जवळ हा भीषण अपघात झाला आहे. या अपघातात दोघांचा मृत्यू (घेंशसरेप झरीज्ञ रललळवशर्पीं) झाला तर गाडीतील एक जण गंभीर जखमी आहे. अपघात नेमका कसा झाला याचा कोरेगाव (घेंशसरेप झरीज्ञ रललळवशर्पीं) पोलीस तपास करत आहेत. पुण्यातील कोरेगाव पार्क परिसरात झालेल्या या भीषण अपघातात सख्ख्या चुलत भावांचा मृत्यू झाला आहे.(घेंशसरेप झरीज्ञ रललळवशर्पीं)



मृत ऋतिक भंडारी आणि यश भंडारी हे गाडीत पुढच्या सीटवर बसले होते,त र कुशवंत टेकवणी हा गंभीर जखमी झाला आहे. गाडीचा हँड ब्रेक ओढल्याने गाडीचं नियंत्रण सुटले आणि गाडी मेट्रो स्टेशनच्या सिमेंटच्या पिल्लरला जाऊन धडकली अशी प्राथमिक माहिती समोर आली आहे. गाडीचा वेग अधिक असल्याचे सीसीटीव्हीमध्ये दिसून येत आहे. एम एच २४ डी टी ८२९२ गाडी काळ्या रंगाची गाडी असून गाडी भाड्याने घेतली असल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

रविवारी, पहाटे साडेपाचच्या सुमारास हा अपघात झाला. पुणे पोलिसांकडून गाडी नेमकी कुठून आली, याचा शोध घेतला जातोय. रस्त्यावरील अनेक सीसीटीव्ही तपासण्याचं काम सुरू केलं आहे. थोड्याच वेळात फॉरेन्सिक टीम अपघातस्थळी दाखल होणार आहे. अपघातातील गाडीत अल्कोहोल किंवा अंमली पदार्थ होते का याची तपासणी करणार आहेत. या घटनेनंतर हळहळ व्यक्त होत आहे.

हा भीषण अपघात कोरेगाव पार्क परिसरातील बंड गार्डन मेट्रो स्टेशनजवळ पहाटेच्या सुमारास झाला. अतिवेगात असलेली कार अचानक नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या डिव्हायडरला धडकली आणि थेट मेट्रोच्या खांबावर आदळली. धडक एवढी जबरदस्त होती की कारचे अक्षरशः तुकडे-तुकडे झाले. या अपघातात ऋतिक भंडारे आणि यश भंडारे या दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांच्यासोबत असलेला एक मित्र गंभीर जखमी झाला आहे. सध्या जखमी तरुणावर रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.

अपघातस्थळावरील सीसीटीव्ही फुटेज आता समोर आले आहे. या फुटेजमधून कारचा वेग किती होता, याचा अंदाज येतो. भरधाव वेगात असलेल्या कारवरील नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

## मराठी अभिनेते सागर कारंडे यांच्या 'पोस्टमन' भूमिकेचा गौरव; टपाल तिकीट प्रकाशित!

**पुणे । प्रतिनिधी**

भारत सरकारच्या 'माय स्टॅम्प' या विशेष योजनेअंतर्गत, सुप्रसिद्ध मराठी लेखक आणि अभिनेते सागर कारंडे यांच्या 'पोस्टमन' भूमिकेचा आगळावेगळा गौरव करण्यात आला आहे. भारतीय डाक दिवस तसेच लोकप्रिय मालिका 'चला हवा येऊ द्या' मध्ये त्यांनी साकारलेल्या 'पोस्टमन' या हृदयस्पर्शी भूमिकेसाठी, त्यांचे टपाल तिकीट तयार करून त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. पुणे सिटी पोस्टच्या सहकार्याने ही अनोखी भेट सादर करण्यात आली आहे.

महान व्यक्ती किंवा महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तींचे फोटो टपाल तिकीटावर छापण्याची भारत सरकारची जुनी योजना आहे. याच योजनेनुसार, सागर कारंडे यांनी 'चला हवा येऊ द्या' या मालिकेत सातत्याने पोस्टमनच्या व्यक्तिरेखेत पत्रवाचन केले. या पत्रवाचनातून त्यांनी अनेक भावना प्रेक्षकांसमोर मांडल्या आणि आजच्या आधुनिक युगातही पोस्टमन या व्यक्तीचे असलेले अनमोल महत्त्व सिद्ध केले.

ईमेल, व्हॉट्सप, फेसबुक, इंस्टाग्राम अशा अनेक सोशल मीडिया माध्यमांच्या



काळातही, जिथे ही आधुनिक माध्यमे पोहोचू शकत नाहीत, तिथे पोस्टमन ही व्यक्ती पोहोचू शकते, हे त्यांनी आपल्या भूमिकेतून प्रभावीपणे दाखवले. त्यांच्या या उत्तुंग भूमिकेमुळे 'पोस्टमन' या व्यक्तीची व्याख्याच बदलून गेली, असे गौरवद्गार यावेळी काढण्यात आले.कारंडे यांच्या या योगदानाचा सन्मान म्हणून, पुणे सिटी पोस्टच्या भारत सरकारच्या टपाल तिकीट योजनेनुसार त्यांचे टपाल तिकीट तयार करण्यात आले. सदर टपाल तिकीट हे पुण्याचे सिटी पोस्ट या मुख्य पोस्ट ऑफिसच्या सहकार्याने, 'माय स्टॅम्प' (चू डींर्रा) या वैयक्तिक टपाल तिकीट योजनेवर आधारित आहे. विशेष म्हणजे, इतर टपाल तिकीटांप्रमाणेच हे टपाल तिकीट देशात कोठेही वापरून पत्र पाठविण्यासाठी ग्राह्य (वैध) असणार आहे.यावेळी समीर धर्माधिकारी, पुणे सिटी पोस्ट मुख्य कार्यालयाचे उप पोस्ट मास्टर संदीप ढवळे आणि त्यांचे सहकारी अभिमन्यू क्षीरसागर हे उपस्थित होते. एका कलाकाराच्या भूमिकेचा टपाल तिकीटाच्या माध्यमातून झालेला हा सन्मान मराठी कलाक्षेत्रासाठी अभिमानास्पद ठरला आहे.